# निवडक मराठी गद्य



संपादक

डॉ. जयद्रथ जाधव
डॉ. राजकुमार मस्के
डॉ. लहू वाघमारे

2287
1.1.2021
891.46
जा नि

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पदवी द्वितीय वर्ष, ऐच्छिक मराठी विषयाच्या (सत्र - ३) अभ्यासक्रमास अनुसरून व अभ्यास मंडळाच्या मान्यतेने अभ्यासपत्रिका - ५ साठी संपादित केलेले पुस्तक.

# निवडक मराठी गद्य

-: संपादक :-

**डॉ. जयद्रथ सुभाषराव जाधव**

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जि. लातूर

**डॉ. राजकुमार खंडू मस्के**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर

**डॉ. लहू दिगंबर वाघमारे**

शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव, जि. लातूर

अरुणा प्रकाशन, लातूर

# अनुक्रमणिका


पत्र

१. **जिवाजी विनायकास पत्र** ........... २५
- छत्रपती शिवाजी महाराज

बखर गद्य

२. **दूत म्हणजे राजा याचे नेत्र होत** ........... २८
- मल्हार रामराव चिटणीस

चरित्र

३. **धर्म आणि विज्ञान** ........... ३२
- दत्तप्रसाद दाभोळकर

प्रबोधन

४. **वैदिक परंपरेची घमेंड** ........... ४४
- आ. ह. साळुंखे

आत्मचरित्र

५. **शिक्षणाच्या प्रवाहात** ........... ५६
- रामराजे आत्राम

## अनुभव


६. **शांती** ............ ६७
- अभय बंग


## ललितलेख


७. **गाई घरा आल्या** ............ ७७
- इंद्रजित भालेराव


## व्यक्तिचित्र


८. **मराठवाड्याचे गांधी : गंगाप्रसाद अग्रवाल** ............ ८९
- उत्तम सूर्यवंशी


❖❖❖

# १.

# जिवाजी विनायकास पत्र

-छत्रपती शिवाजी महाराज

***छत्रपती शिवाजी महाराज (इ.स.१६३० - इ.स.१६८०)*** *यांचे हे प्रशासकीय पत्र आहे. छत्रपती शिवाजीराजे आपल्या प्रशासनात किती दक्ष होते, याचा नमुना या पत्रातून पाहावयास मिळतो. मामले प्रभावलीचा सुभेदार जिवाजी विनायक यांनी दौलतखान व दर्यासारंग यांना आरमाराचा ऐवज व गल्ला पोचता न केल्यामुळे दि. १८ जानेवारी १६७५ रोजी हे पत्र शिवाजीराजे लिहितात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात नेमलेले काम जर कोणी करीत नसतील तर त्याचा हुद्दा, जातपात आणि नातेगोते न पाहता स्पष्टपणे आदेश दिले जात.*

*प्रस्तुत पत्र अत्यंत नेटकेपणाने लिहिले असून हे कर्तव्याची जाणीव करून देणारे आहे. या पत्रातून तत्कालीन भाषेची वैशिष्ट्ये दिसून येतात.*

माघ शु. ३ शके १५९६ मशहुरुल हजरत राजश्री जिवाजी विनायक सुबेदार व कारकून सुबे मामले प्रभावळीं, प्रति राजश्री शिवाजीराजे दंडवत. दौलतखान व दरियासारंग यासी ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत. पेशवे याणी बराता सुबे मजकुरावरी दिधल्या. त्यास तुम्ही काही पाठविलें नाही म्हणोन कळों आले. त्यावरून अजब वाटलें की, ऐसे नादान थोडे असतील! तुम्हास समजले असेल की याला ऐवज, कोठेतरी ऐवज खजाना रसद पाठविलिया मजरा होईल म्हणत असाल. तरी पद्मदुर्ग बसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली आहे. त्याची मदत व्हावी, पाणी फाटी आदिकरून सामान पावावें, या कामास आरमार बेगीनें पावावें, ते नाहीं. पद्मदुर्ग हबशी फौजा चौफेर जेर करीत असतील. आणि तुम्ही ऐवज न पाववून, आरमार खोळंबून पाडाल! एवढी हरामखोरी तुम्ही कराल आणि रसद पाठवून मजरा करूं म्हणाला त्यावरी साहेब रिझतील की काय? हे गोष्ट घडावयाची तऱ्ही होय न कळे की हबशियांनी कांही देऊन आपले चाकर तुम्हाला केले असतील! त्याकरितां ऐसी बुद्धी केली असेल! तरी ऐशा चाकरास ठीकेठीक केले पाहिजेत! ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करू पाहतो? या उपरी तऱ्ही त्याला ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंती देविला असे तो देवितील.तो खजाना रसद पावलियाहून अधिक जाणून तेणेप्रमाणे आदा करणे की, ते तुमची फिर्याद न करीत व त्यांचे पोटास पावोन आरमार घेऊन पद्मदुर्गाचे मदतीस राहत तें करणे या उपरी बोभाट आलिया उपरी तुमचा मुलाहिजा करणार नाही. गनिमांचे चाकर, गनिम जालेस, ऐसे जाणून बरा नतीजा, तुम्हास पावेल. ताकीद असे.

**(शिवकालीन-पत्र-सार-संग्रह : खंड - १)**

शब्दार्थ टिपा

मशहुरुल (फा) - प्रसिद्ध, मान्य,

हजरत (फा)- आश्रयदाता, स्वामी,

अजब (अ)- आश्चर्य,

जेर (फा) - हैराण,

आदा (अ)- भरणा,

गनिम (अ) - शत्रू,

बरात (अ) - हुंडी,

नतीजा (अ) - शिक्षा,

फाटी (स्त्री) - लाकडे, सरपण,

मजरा (वि.)- मादक, कैफ आणणारा,

हशबी (अर.पु.) - अबिसिनिया देशाचा रहिवासी

❖❖❖

# २.

# दूत म्हणजे राजा याचे नेत्र होत

-मल्हार रामराव चिटणीस

**मल्हार रामराव चिटणीस (मृत्यू १८२३)** सातारकर छत्रपती धाकटे शाहू महाराज यांचे ते चिटणीस होते. चिटणीसांचे घराणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून सातारच्या छत्रपती राजघराण्यापर्यंत चिटणीस म्हणून होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे चिटणीस खंडो बल्लाळ हे मल्हार रामरावांचे पणजोबा. यामुळेच मल्हार रामरावांस 'पुरातन सेवक' असे सन्मानाने छत्रपतींनी संबोधले आहे.

मल्हार रामराव चिटणीस हे पेशवाईचा अखेरचा कालखंड व ब्रिटिश साम्राज्याचा प्रारंभीचा कालखंड या सीमारेषेवरचे महत्त्वाचे बखरकार होते. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, छत्रपती शाहू महाराज, छत्रपती रामराजे महाराज व छत्रपती प्रतापसिंहांचे वडील छत्रपती दुसरे शाहू महाराज यांच्यापर्यंतच्या सहा छत्रपतींची चरित्रे इ. स. १८१० पूर्वी मल्हार रामरावांनी लिहिली होती.

*याबरोबरच मराठ्यांच्या राजनीतीचे विवेचन करणारा 'राजनीती' हा सातवा ग्रंथही त्यांनीच लिहिला आहे. या सात ग्रंथांच्या लेखनाला 'सप्त प्रकरणात्मक बखरी' म्हणून संबोधले जाते. 'दण्डनीती' हा ग्रंथही त्यांच्या नावावर आहे.*

*'दूत म्हणजे राजा याचे नेत्र होत' या बखर गद्यातून राजाच्या दूताची पात्रता, त्याची लक्षणे व कार्ये सांगितली आहेत. एक प्रकारे ती दूताची आचारसंहिताच आहे.*

---

आतां दूत - प्रेषण म्हणजे दूत पाठविणें ते कसें म्हणाल तरी सांगतो. आपण जाऊन राजकार्य अवश्यमेव करूनच येईन असा ज्यास अभिमान व प्रौढ व स्मरणवान व बोलणार व सकलशास्त्र जाणणार व शूर व कार्याचें ठायीं अति तत्पर असा असेल त्यासच योजून पाठवावा. आतां दूतांची लक्षणें तीन प्रकारचीं आहेत. ती कशीं कशीं विचाराल तरि सांगतो. एक 'निसृष्टार्थ', 'मितार्थ' व 'शासनवाहक' असे तीन प्रकार. त्यांचीच विविक्षा सांगतो. 'निसृष्टार्थ' म्हणजे देश, काल योग्य असे पाहून बोलणार यास 'निसृष्टार्थ' म्हणावें. आतां 'मितार्थ' सांगतो. जितके सांगून पाठविलें तितकेंच जाऊन बोलणार त्यांस 'मितार्थ' म्हणावें. आतां शासनहर सांगतो. इकडील पत्र त्यास नेऊन द्यावे, तिकडील उत्तर यास आणून द्यावे, यास शासनहर म्हणावें. याजप्रकारे तीन लक्षणे दूताचे ठायीं आहेत, म्हणोन सांगितली. आतां निसृष्टार्थ दूत यांणी शत्रूकड़े गेला असतां शत्रुनगराचे ठायीं उगेच जाऊं नये. आधी त्या राजियास सांगून पाठवावें. त्याची आज्ञा आणून नंतर त्याचें नगरांत प्रवेश करावा. नगरांत गेल्यावरि राजसभेंतही जाणें ते समयीं राजियास सांगून पाठवून त्याचें उत्तर आणून मग राजसभेंत जावे. सभेंत गेल्यावरि राजा यास अभिवंदन करून उभेंच रहावें. बसों नये. राजा येणे बसा म्हटलें तर बसावें. शत्रुराज्याचा सर्व शोध करावा व दुर्गाचाही शोध घ्यावा. व दुर्गांत रक्षकादि कसे आहेत व तेथें यंत्रें आदी

करून साहित्य कसें आहे याचाहि शोध घ्यावा. राजा कोशसंपन्न कसा आहे व यास मित्र कोण कोण आहेत, कितीक आहेत व सेना किती आहे, ती कशी आहे, हें पाहून व राजाची छिद्रें असतील तीं सकळ जाणून व प्रजेची राजा यांचे ठायीं अनुरक्तता कशी आहे किंवा उदास आहे, राजा याचें गुणवर्णन करिते किंवा नाहीं करीत, व फळेंकरून व द्रव्येंकरून व कर्मेंकरून राजास कशा.. भजतात याचा शोध घ्यावा व सभेचे ठायीं आपले स्वामीची आज्ञा तदनुरूप भय पावत नाहीं असें निःशंकपणे बोलावें. व आपले राजा याची व शत्रूकडे आला त्या राजाची-चतुर्विधवृत्त राज्यांत असावें तें पहिलें सांगितलें-त्या चतुर्विध प्रकारें करून राजाची स्तुती करावी व आणखी तीर्थे व आश्रम वगैरे स्थानें यांचें वर्णन करून राजा यांस संबोधन द्यावे कीं,' हा राजा व आपला राजा सकळ शास्त्रें जाणणार असे आहेत. हें बोलणे तें आणखी जन सभेंत बसले असतील त्यांशी बोलत असावें व जनांसि आपला राजा याचें ऐश्वर्य सांगावें. तें कसें म्हणाल तरी प्रताप व कुल व ऐश्वर्य म्हणजे संपत्ति व दानशूरता व मिष्टान्नें करून ब्राह्मणभोजनें घालणार असा थोर परमदक्ष याजप्रकारें करून बोलावें व दूत जो येणें राजा आपणांसि अनिष्ट बोलिला असतांहि त्याचें सहनच करावें. आपणांस कामक्रोधही नसावा आणि वेतसी वृक्ष म्हणजे नदीचे ठायीं शेरणीचे वृक्ष उंच असे असतात, महापुरही आला तरी नम्रत्वें करून असतां कदापि भय पावत नाहींत, तसें प्रकारें दूत जो येणें नम्रत्वें असावे. व आपणांसि बोलिला असतां आपण त्यांसि धिकारून बोलूं नये. त्याचा अंतर्भाव काढावा. आपण आपला अंतर्भाव देऊं नये. एकटेच निद्रा करावी व स्त्रियांचा संग करू नये व मद्यपानही करूं नये. याचें कारण सांगतो. आपला अंतर्भाव निद्रेंत स्वप्नांत बोलत उठल्या अन्यास कळेल, यास्तव एकटेंच निजावे.' व स्त्रियांशी संग केला असतां कामासक्त होऊन त्यांशी कोणेसमयीं काय बोलणें पडेल न कळे व मद्यपानें करून अव्यवस्थपणेही काय बोलणे घडेल न कळे, म्हणून तिन्हीं सांगितलेली कर्मे करूं नयेत.

सकळ राज्याचा शोध घ्यावा व अरण्यें असतील त्यांचाहि शोध घ्यावा व राजा यांचे आसमंताभ्दार्गी कोण कोण राजे आहेत, ते या राजियास अनुकूल कोण, प्रतिकूल कोण आहेत व युद्धास भूमि चांगली कोणती याचा शोध करणें ही दूताची कर्मे होत. 'दूत म्हणजे राजा याचे नेत्र होत.' यास्तव दूतद्वारा राजा येणें सकळ जाणत असावें व परराज्यांतील वृत्तांत पाहत असावा. ही निसृष्टार्थ दूत सांगितला त्याचीं लक्षणे व कर्मे होत.

**(मल्हार रामराव चिटणीसकृत सप्तप्रकरणात्मक राजनीति, बलप्रकरण)**

❖❖❖

# ३.

## धर्म आणि विज्ञान

**-दत्तप्रसाद दाभोळकर**

***डॉ. दत्तप्रसाद अच्युत दाभोळकर (जन्म १९३८)*** *हे मराठी वैज्ञानिक आणि चिकित्सक लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात त्यांचे अत्यंत मोलाचे योगदान आहे. ते 'श्रीराम इन्स्टिट्यूट फॉर इंडस्ट्रियल रीसर्च' या दिल्लीमधील नामांकित संशोधन संस्थेचे २३ वर्षे संचालक होते. त्यांच्या नावे शंभराहून अधिक पेटन्टस आणि अनेक संशोधनपर निबंध आहेत.*

*'विज्ञानेश्वरी,' 'तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय,' 'बखर राजधानीची,' 'प्रकाशवाटा,' 'माते नर्मदे,' 'ना डावं ना उजवं,' 'दुसऱ्या फाळणीपूर्वीचा भारत' आणि 'शोध स्वामी विवेकानंदांचा' इत्यादी त्यांची साहित्यसंपदा प्रकाशित आहे. 'छाया' हा काव्यसंग्रह आहे. मराठी साहित्यातील भरीव योगदानाबद्दल पुणे मराठी ग्रंथालयाने 'साहित्यसम्राट न. चिं. केळकर पुरस्कारा'ने त्यांचा गौरव केला आहे. वैज्ञानिक कामगिरीसाठी 'प्लॅस्टिक*

*ॲण्ड रबर इन्स्टिट्यूट,' 'इन्स्टिट्यूट ऑफ मटेरिअल्स' आणि 'रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री' या विदेशातील तीन मान्यवर संस्थांचे 'फेलो' पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. तर अत्युत्कृष्ट औद्योगिक संशोधनासाठी 'फाय फाऊंडेशन' पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.*

*'धर्म आणि विज्ञान' या मानवी जीवनाच्या दोन बाजू आहेत. यांतील सहकार्य आणि समन्वयाची भूमिका स्वामी विवेकानंदांच्या विचारांतून स्पष्ट होते, हे दत्तप्रसाद दाभोळकर यांनी सांगितले आहे.*

---

जगातील सर्व माणसांचे मंगल करण्यासाठी जन्माला आलेल्या आणि ते अंगभूत सामर्थ्य जवळ असलेल्या सर्व धर्मांनीच मानव जातीचे सर्वांत मोठे नुकसान केले आहे आणि विज्ञान नेमके हेच करतेय आणि हेच करणार हे त्यांना जाणवले होते. धर्म आणि विज्ञान-तंत्रज्ञान यांच्यात असलेले अमर्याद सामर्थ्य आणि त्यांच्या अमर्याद मर्यादा स्वामी विवेकानंद ओळखून होते. धर्मामुळे येणारे कर्मकांड आणि अंधश्रद्धा दूर व्हावयास हव्यात, विज्ञान-तंत्रज्ञान यामुळे येणाऱ्या चंगळवादाला लक्ष्मणरेषा हवी. हे सारे करावयाचे असेल तर धर्म आणि विज्ञान यांनी एकमेकांना घाबरून वा एकमेकांची खिल्ली उडवीत एकमेकांपासून दूर राहून चालणार नाही. त्यांच्यात नुसते सहकार्य असूनही चालणार नाही तर त्यांच्यात समन्वय हवा, असे ही त्यांचे सांगणे होते. या विषयावर त्यांनी वेळोवेळी जे विवेचन केले त्याचे संकीर्ण, तुटक संकलन असे करता येईल.

१. आधुनिक शास्त्रीय संशोधनाच्या प्रचंड भडिमारापुढे पश्चिमेकडील स्वमतान्ध धर्मसंप्रदायांचे जुनाट किल्ले धडाधड कोसळून जमीनदोस्त होत आहेत. चर्च सदस्यांच्या बहुमतावर अथवा श्रद्धेवर आधारलेली ठिसूळ धर्ममते आधुनिक विज्ञानाच्या घणाखाली फुटून चक्काचूर होत आहेत. वैज्ञानिक विचारांच्या सतत वाढतच जाणाऱ्या लोंढ्याला तोंड कसे द्यावयाचे

या चिंतेने धर्मपंथांची मती गुंग होऊन गेली आहे. विज्ञानाच्या वाढत्या ससेमिऱ्यामुळे बहुतेक धर्मांच्या शास्त्रातील वचनांचा, त्यांच्या अर्थाचा अनर्थ होईपर्यंत ताणण्याची पाळी आली असून या ओढाताणीत त्यातील अधिकांश पोथ्या बेकाम झाल्या कारणाने त्यांना अडगळीच्या खोलीत जमा व्हावे लागत आहे. अधिकांश विचारशील व्यक्ती धर्माशी असलेले आपले सारे संबंध तोडून टाकून अशांतीच्या महासागरात इतस्ततः वाहवत आहेत.

२. जगातील सगळे लोक 'बायबल' किंवा 'कुरआन' किंवा इतर ग्रंथ वाचतात पण ते जे वाचतात ते फक्त शब्दच असतात. वाक्यरचना, शब्दव्युत्पत्ती व भाषाशास्त्र यांतच ते घुटमळत असतात. जणू काही धर्माच्या सांगाड्याची शुष्क हाडेच ते चघळत असतात पण शब्द म्हणजे आतील अर्थाचा फक्त बाह्य आकार होय. शब्दजाल म्हणजे एक भयंकर अरण्यच होय. त्यात मनुष्य एकदा शिरला की त्यातून बाहेर पडण्याचा त्याला मार्गच सापडत नाही. जगातील थोर अशा कोणत्याही धर्माचार्यांनी असले काही चुकूनही केलेले नाही. त्यांनी सांगितले आहे 'एक तरी ओवी अनुभवावी.'

३. विज्ञानाला एक मर्यादा आहे. विज्ञान तुमचे व माझे शाश्वत अस्तित्व नाकारते. जन्माला येण्यापूर्वी व मृत्यूनंतर तुमचे-माझे अस्तित्व माती वा मातीतून बनलेले एक रसायन आहे एवढेच आणि फक्त एवढेच विज्ञान खात्रीपूर्वक सांगते. हे खरेही असेल किंवा हे खरे की खोटे या वादात मला आता पडावयाचे नाही. एक मात्र खरे. मृत्यूनंतर काय? या जगापलीकडे काय आहे? सत्य काय आहे? या मानवाने अशांत, व्याकुळ चित्ताने विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर शोधण्याचे काम जगातील अध्यात्म, धर्म, तत्त्वज्ञान करीत असतात. जोपर्यंत मानवाला मरण येत राहणार तोवर हा प्रश्न पुनःपुन्हा विचारला जाणार आहे. मृत्यू! सारे जग एका क्षणात लोपून नाहीसे होते. मृत्यूनंतर काय? या प्रश्नांची धार काळ कधीच बोथट करू शकत नाही. फक्त आजचाच विचार करा, हा उपदेश धोकादायक

आहे. कारण भूतकाळ आणि भविष्यकाळ नाकबूल केल्यास वर्तमानकाळही त्याबरोबरच अपरिहार्यपणे नाकबूल केला जातोच किंवा एक तत्त्वज्ञान सांगते, त्याप्रमाणे या सर्वांचा अर्थ एवढाच की, तुम्ही मरण पावता त्या वेळी भोवतालचे सारे विश्व पण नाहीसे झालेले असते.

४. खरे कारण असे आहे की, विज्ञान फक्त मानवी ज्ञानेंद्रियांवर विश्वास ठेवते तर जगातील सर्वच धर्म हे एक महान विधान करतात की, मानवी मन कित्येक क्षणी केवळ इंद्रियांचे नव्हे तर तर्काची शक्तीसुद्धा उल्लंघून जात असते. त्या अवस्थेत मग त्याला अशा सत्यांचा प्रत्यक्ष साक्षात्कार होतो की, त्यांचा त्याला एरवी कधीही प्रत्यय आला नसता. तर्कानेसुद्धा ती त्याला कदापि गवसली नसती आणि हीच सत्ये जगामधील समस्त धर्मांचा पाया होत. अर्थातच या सत्यांना आव्हान देण्याचा, त्यांना तर्काच्या कसोटीवर घासून पाहण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे. तथापि जगात विद्यमान असलेले सर्वच धर्म असे ठासून सांगतात की, इंद्रियांच्या आणि बुद्धीच्या सीमा ओलांडून जाण्याची ही विलक्षण शक्ती मानवी मनात असते आणि मानवी मनाची ही शक्ती म्हणजे एक सप्रमाण सिद्ध झालेली गोष्ट आहे. म्हणजे एक धर्म खरा ठरला तर बाकी सर्व धर्म खरे ठरतात आणि एक खोटा ठरला तर सारेच खोटे ठरतात, हे धर्मावर प्रेम करणाऱ्यांनी समजावून घेतले पाहिजे.

पदार्थ विज्ञानासारख्या शास्त्राचे शोध मूर्त स्वरूपाचे असतात, तर त्याउलट धर्मांनी प्रचारलेली सत्ये ही अमूर्त स्वरूपाची असतात. अत्यंत सुसंघटित अशा सर्वच धर्मांमध्ये त्या सत्यांना शुद्ध एकरस, एकसंध अमूर्त तत्त्वांचे स्वरूप येत असते. मग कुणी त्याला 'सर्वव्यापी पुरुष' म्हणोत, 'ईश्वरनामक अमूर्त व्यक्ती' म्हणोत, 'नैतिक नियम' म्हणोत किंवा 'वस्तुमात्राला आधारभूत असे अमूर्त सत्-तत्त्व' म्हणोत. हे जाणवते त्या वेळी समजते की, अनंत शक्ती, अनंत आनंद कधी इंद्रियांमधून कवटाळता येणार नाही किंवा मी म्हणतो त्याप्रमाणे अतिंद्रिय प्रत्ययाखेरीज खरी नीती असूच

शकत नाही. माणसांना त्यांच्या इंद्रियजन्य सुखाच्या आणि त्यांच्या समाजाच्या आणि धर्माच्या सीमांमध्येच जखडून ठेवणारी कोणतीही मतप्रणाली मानवजातीच्या नीतिनियमांना काही अर्थ लावू शकणार नाही. मला वाटते, धर्माचे खरे मूळ 'इंद्रियांच्या मर्यादा उल्लंघून जाण्याचा प्रयत्न आहे.'

५. पाच ज्ञानेंद्रिये असलेल्या मानवप्राण्याच्या दृष्टीतूनच आपण हे जग पाहू शकतो. कल्पना करा की, आपल्याला आणखी एक ज्ञानेंद्रिय लाभले तर हे समस्त विश्व मग आपल्याला निराळेच दिसू लागेल. साऱ्या विश्वाचे आपले आकलन अगदी बदलून जाईल. क्षणभर कल्पना करा की आपल्याला घ्राणेंद्रिय, दर्शनेंद्रिय, श्रवणेंद्रिय वगैरेंसारखेच सहावे एक चुंबकेंद्रिय प्राप्त झाले आहे. (चुंबकीय शक्ती आपणाला थोडीफार माहीत आहे, म्हणून मी येथे चुंबकेंद्रियाचे उदाहरण दिले आहे.) आपण आज ज्यांची कल्पनाही करू शकत नाही अशा लाखो शक्ती या विश्वात असल्या पाहिजेत. आपली इंद्रिये समर्याद आहेत, अमर्याद नव्हे आणि या मर्यादांमध्येच आपले सर्व जग अवस्थित आहे.

६. बाह्य वस्तूंचे अस्तित्वच या वासना निर्माण करते. प्रकाशामुळेच नेत्रांची उत्पत्ती झाली. ध्वनीमुळेच कानांची उत्पत्ती झाली. त्याचप्रमाणे मानवाची प्रत्येक इच्छा बाहेरच्या जगात आधीच विद्यमान असलेल्या पदार्थांमुळेच उत्पन्न झालेली आहे. पूर्णत्वप्राप्तीची, प्रकृतीच्या पलीकडे जाण्याची ही आकांक्षादेखील आपोआप कशी उत्पन्न होईल? कोठे तरी ही आकांक्षा उत्पन्न झाली असली पाहिजे. माणसाच्या आत्म्यात ती जिवंत ठेवली असली पाहिजे आणि म्हणून मनातील ही आकांक्षा जो ओळखेल त्याला ती साध्य असली पाहिजे. - खरी अडचण ही आहे की, हे ओळखण्यापलीकडे किंवा ईश्वरापलीकडे आपणाला सर्व काही हवे असते. म्हणजे आज जो आपणाला सर्वत्र दिसतो तो धर्म नव्हे. दिवाणखान्यात एखादी शोभेची वस्तू अभिमानाने ठेवून इतरांना दाखवावी, असे आज आपण धर्माबाबत करतो.

७. आता प्रश्न असा आहे की, आत्मा जर अनंत आहे आणि तो जर सर्वत्र आहे. तो जर अजड-अपार्थिव असेल तर तो सर्वव्यापी असलाच पाहिजे. मग त्याने देह धारण करणे आणि एकामागोमाग एक अशा शरीरांतून प्रवास करणे याचा अर्थ काय? खरी गोष्ट ही आहे की, आत्मा येत नाही किंवा जात नाही. जन्मत नाही किंवा मरत नाही. आत्मा हा एखाद्या शरीरात राहतो असे म्हणणे अर्थशून्य आहे, मूर्खपणाचे आहे. जे अमर्याद आहे ते एखाद्या मर्यादित जागेत कसे राहू शकेल?

८. कोणत्याही बाह्य यंत्राने मनाचे विश्लेषण करता येत नाही. समजा, विचार करीत असताना मेंदूतील हालचाली तुम्हाला पाहता आल्या तर काही अणू इकडून तिकडे जात आहेत एवढेच फक्त तुम्हाला दिसेल. विचार, जाणीव, कल्पना, प्रतीके आदी गोष्टी काही तुम्हाला दिसणार नाहीत. तुम्हाला केवळ विपुल कंपने दिसतील. रासायनिक आणि भौतिक परिवर्तने दिसतील. या उदाहरणांवरून हे लक्षात येते की, अशा प्रकारचे विश्लेषण काहीच उपयोगाचे होणार नाही. मन म्हणूनच मनाचे पृथःक्करण करू शकेल अशी दुसरी एखादी पद्धती आहे काय? तशी पद्धती उपलब्ध झाली तर धर्माचे खरे शास्त्र बनणेही शक्य आहे. 'होय तशी शक्यता आहे,' असा राजयोगशास्त्राचा दावा आहे पण येथे एक मोठी अडचण आहे; ती अशी- भौतिक विज्ञानात पदार्थाचे निरीक्षण करणे त्यामानाने सोपे असते. विश्लेषणाची उपकरणे काटेकोर असतात आणि पदार्थ व उपकरणे या दोन्ही गोष्टी विश्लेषण करणाऱ्याच्या बाहेर असतात पण मनाच्या बाबतीत, जिचे पृथःक्करण व्हायचे ती वस्तूही मनच असते आणि ज्याच्या साहाय्याने पृथःक्करण करावयाचे तेही मनच असते.

बाह्य विश्लेषण हे मेंदूचे परीक्षण करून त्यातील भौतिक आणि रासायनिक परिवर्तनांचा शोध घेईल. जाणीव म्हणजे काय? कल्पनाशक्ती म्हणजे काय? कल्पनांचा हा जो विशाल समूह निर्माण होतो तो कोठून येतो? कोठे जातो? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे बाह्य परीक्षणाने मिळणे शक्य

नाही. पण या गोष्टींचे अस्तित्व आपणाला अमान्य करता येणार नाही. आपण कल्पना करतो आणि कल्पनांची आपणाला जाणीव असते. आपल्या दृष्टीने आपण म्हणजे एक फार मोठे रहस्य आहोत.

९. भिन्न भिन्न व्यक्तींनी भिन्न भिन्न समयी ज्या आध्यात्मिक सत्यांचा शोध लावला, त्यांच्या चिर-संचित कोशालाच धर्म असे नाव आहे. मानवजातीला ज्ञात होण्यापूर्वीही गुरुत्वाकर्षणाचा नियम आपले कार्य करीत होता आणि संपूर्ण मानवजातीला त्याचा विसर पडला तरी तो कार्य करीत राहील. आध्यात्मिक नियमांचेही असेच आहे. एका जिवात्म्याचे इतर जिवात्म्यांशी आणि सर्व जिवात्म्यांचे त्या परमपिता परमात्म्याशी जे सारे दिव्य नि विशुद्ध संबंध आहेत, ते सर्व त्यांचा शोध लावण्यापूर्वी विद्यमान होते आणि आपल्याला त्यांचा विसर पडला तरीही आहेत तसेच राहतील.

१०. धर्माच्या सत्यत्वाचा पुरावा ग्रंथात नसून तो मानवाच्या यथार्थ स्वरूपात आहे. हे धर्मग्रंथ मानवाच्या स्वरूपाचे बाह्य आविष्कार किंवा कार्ये आहेत. मानवानेच या ग्रंथांची रचना केली आहे. ग्रंथांनी मानवाची रचना केल्याचे अजून ऐकिवात नाही ! बुद्धीदेखील तद्वतच त्याच सर्वसामान्य कारणाचा - मानवाच्या स्वभावाचा, त्या दिव्य स्वरूपाचा एक आविष्कार आहे आणि म्हणून आपण त्याचेच अनुकरण केले पाहिजे.

आणखी स्पष्ट शब्दांत असे विचारता येईल की, ज्या बुद्धीने लावलेल्या शोधांवर सर्व विज्ञानशास्त्र अवलंबून आहे त्या बुद्धीचाच आधार धर्माने घ्यावयास हवा काय ? ज्या अन्वेषणपद्धती विज्ञान शास्त्रांना व बाह्य वस्तूंना आपण लावतो त्याच धर्मविज्ञानालाही लावल्या पाहिजेत काय? माझ्या मते असेच व्हावयास पाहिजे व असे जितक्या लवकर होईल तितके बरे. जर अशा प्रकारच्या अन्वेषणाने एखाद्या धर्माचा विध्वंस झाला तर तो कुचकामाचा होता, असे समजले पाहिजे. तो अनुचित अंधविश्वासाखेरीज आणखी काहीही नव्हता, असेच म्हटले पाहिजे. तो जितक्या लवकर नष्ट

होईल तितके चांगले. मला अगदी निश्चितपणे वाटते की, अशा धर्माचा वा धर्मातील अशा भागांचा विनाश म्हणजे सगळ्यात चांगली गोष्ट होईल. धर्मातील जो गाळ आहे तो नाहीसा होऊन जाईल पण त्यातील सारभूत अंश मात्र या अन्वेषणातून तावूनसुलाखून बाहेर पडेल. हा अंश मात्र पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र यांच्या सिद्धांताइतका शास्त्रशुद्ध ठरेल. इतकेच नव्हे तर तो त्याच्याहूनही जास्त शक्तिशाली ठरेल कारण पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र यांना स्वतःच्या सत्यत्वाची ग्वाही देण्यासाठी आतून जी साक्ष लाभत नसते ती धर्माला लाभलेली आहे. जे लोक धर्माची बुद्धिवादानुसार छाननी करणे योग्य नाही असे म्हणतात त्यांचे विचार स्वविरोधी वाटतात.

११. धर्म व विज्ञान यांमधील संघर्ष जर असाच सुरू राहिला तर धर्मांची संपूर्ण इमारत कोसळल्याशिवाय राहणार नाही. मानवजात धर्म सोडेल असे नव्हे तर धर्माच्या सांगाड्याला धर्म म्हणून कवटाळून बसलेला असेल. हे मानवजातीच्या दृष्टीने सर्वांत भयावह आहे. विज्ञान आणि धर्म यांत एक फरक आहे. पदार्थविज्ञान शास्त्राला त्यांना गवसलेल्या घटनांच्या स्पष्टीकरणांसाठी भुताची वा देवाची गरज नसते. सगळी भौतिकशास्त्रे वस्तूंचे स्पष्टीकरण त्यांच्या स्वरूपातूनच मिळावे, अशी अपेक्षा करतात. वस्तूच्या स्वभावाच्या द्वारेच त्यांना त्यांचे स्पष्टीकरण हवे असते. धर्म मात्र विश्वापासून अगदी वेगळा, विश्वाची उत्पत्ती करणारा व धर्माने ज्याला विश्वाचा स्वामी म्हटले आहे अशा ईश्वराची कल्पना करतो. हा ईश्वर अत्यंत दयाळू असा कल्पिला गेला आहे तरी पण जगामध्ये कायमची विषमता आहे. त्याचे पुन्हा थातुरमातुर उत्तर आहे. म्हणजे धर्माच्या उच्चाटनाचा अर्थ हा की धर्म विश्वाबाहेरील व माणसासारख्याच पण माणसाहून मोठ्या ईश्वराच्या कल्पनेला चिकटून राहिला आहे.

१२. विज्ञानाशी सुसंगत असा धर्म असू शकतो का? मला वाटते असू शकतो. धर्मात 'सामान्यीकरणाचे तत्त्व असले पाहिजे. त्याचबरोबर 'क्रमविकासाच्या' तत्त्वाचाही धर्माने पुरस्कार केला पाहिजे. मात्र विज्ञानाशी

सुसंगत असा धर्म हवा असेल तर सर्वधर्म समजलेल्या धर्माचार्यांनी प्रामाणिकपणे' विज्ञानाच्या मूलभूत संकल्पना समजावून घेतल्या पाहिजेत.

या विधानाला उत्तर पक्षही आहे. अनेक नामवंत शास्त्रज्ञ ज्यांना प्रयोगशाळेबाहेरचे काहीच माहीत नसते आणि प्रयोगशाळेबाहेर जाण्यासाठी ज्यांच्याकडे वेळही नसतो, माझ्या भाषणांना येतात. थोडे चिंतित, थोडे अस्वस्थ होतात. मी त्यांना सांगतो ते त्यांना पटते. ईश्वर कुठे आहे? धर्माचे क्षेत्र कुठे आहे? ते इंद्रियांच्या पलीकडे आहे. जाणीवेच्या पलीकडे आहे. ज्या विभिन्न पातळींवर आपण कार्य करतो त्यांपैकी जाणीव ही केवळ एक पातळी आहे. त्या जाणीवेच्या पलीकडे आपल्याला जायला पाहिजे, इंद्रियांच्या पलीकडे जायला पाहिजे.

हे कठीण आहे, पण अनेक विज्ञानप्रेमी लोकांना हे खोटे वाटते. त्यांनी त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करावा. शास्त्रज्ञांनी चंद्रावर पाणी आहे व चंद्र असा आहे म्हणून सांगितले तर मी ते खोटे आहे असे म्हणू नये. तो चंद्र समजावून घेण्यासाठी असलेला अभ्यास, तो दिसावा म्हणून बनविलेली व वापरलेली दुर्बीण समजावून घेऊन वापरावी. मग हवे तर हे खोटे आहे असे म्हणावे. तोवर ते मला समजत नाही, असे म्हणावे. मला पटत नाही, असेसुद्धा म्हणू नये. विज्ञान समजावून घ्यावयाचे तर एका संपूर्ण वेगळ्या अभ्यास करण्याच्या पद्धतीला समजावून घेऊन धर्माचार्यांना त्या पद्धतीने अभ्यास करावा लागेल. - धर्म समजावून घ्यावयाचा असेल तर वैज्ञानिकांना एक संपूर्ण वेगळी पद्धती 'साधना म्हणजे काय?' हे समजावून घ्यावे लागेल. ती समजावून घेऊन त्यांना ती करावी लागेल. त्यांनी असे करावे ही काळाची गरज आहे. किमानपक्षी धर्मातील ही तत्त्वे, हे विचार खोटे आहेत असे म्हणण्याऐवजी या गोष्टी मला समजत नाहीत, असे वैज्ञानिक परंपरेत बसणारे विधान करावे.

१३. ज्ञानाचा अर्थ, नव्या अनुभवाला पूर्वसंचित अनुभवांच्या कप्प्यात घालणे आणि अशा प्रकारे नव्या अनुभवांची ओळख पटवून घेणे.

ओळख पटणे म्हणजे काय? नवीन अनुभव पूर्वीच्या तत्सम अनुभवांशी ताडून पाहणे यापलीकडे ज्ञानाला काही अर्थ नाही. हे जर असे आहे तर या ज्ञानप्रक्रियेत, समान असलेल्या सर्व अनुभवांची संपूर्ण मालिकाच आपणाला पाहावी लागते.

१४. आपल्याला हे माहीत आहे की, विज्ञानानुसार एखाद्या पदार्थाची गती वाढविली की, वस्तुमान कमी होते व वस्तुमान वाढले की गती कमी होते, म्हणजे जडद्रव्य व शक्ती या दोन गोष्टी झाल्या. जडद्रव्य शक्तीत लीन होते व शक्ती जडद्रव्यात लय होते. हे कसे घडते हे आपल्याला कळत नाही. म्हणून जे जडद्रव्यही नाही व शक्तीही नाही असे काही तरी असले पाहिजे. एरवी जडशक्ती व जडद्रव्य एकमेकांत लीन होणार नाहीत. या वस्तुलाच आम्ही 'मन', 'वैश्विक मन' म्हणतो. जडद्रव्य आणि मन यांच्यात आपल्याला जो मेळ वा जी एक संगती आढळून येते तिचे कारण असे की, ती दोन्ही एकाच अज्ञात वस्तूच्या (ब्रह्माच्या) केवळ दोन बाजू आहेत. तीच वस्तू दुभागून बाह्य (जडद्रव्य) आणि आंतर (मन) झाली आहेत.

१५. जड विज्ञानाचे कार्य आहे घटनांचे निरीक्षण करून त्यांची नोंद करणे व त्यातून नियम बनविणे. धर्मामध्ये मात्र मूर्त वा स्थूल त्यापरीस अमूर्त वा सूक्ष्मतत्त्व आणि अंतिम एकत्व या तिन्हींचा अंतर्भाव होतो. केवळ स्थूल वा मूर्त वा सविशेष गोष्टीत किंवा तपशिलांमध्ये घुटमळू नका; तत्त्वाकडे - त्या अंतिम सूक्ष्म, अमूर्त तत्त्वाकडे - त्या एकत्वाकडे - त्या एकमेवाद्वितीयाकडे जाण्याचा यत्न करा.

१६. आज आपण ज्यांना आधुनिक विज्ञान म्हणतो त्या विषयासंबंधीचा उपनिषदांमध्ये इतस्ततः विखुरलेला 'तपशील' पुष्कळदा चुकीचा निघेल; परंतु त्याचबरोबर त्यांची मूलतत्त्वे' मात्र बरोबर आहेत हेही तितकेच खरे. मूलतत्त्वांच्या अनुसंधानाच्या बाबतीत हिंदू दार्शनिक आधुनिक विचारवंतांइतकेच, किंबहुना प्रसंगी त्यांच्यापेक्षाही जास्तच निर्भीड

होते. त्यांनी अतिशय व्यापक असे किती तरी सामान्य सिद्धान्त शोधून काढले आहेत, की जे आजही पूर्णतया अभिनवच वाटतात आणि त्यांच्या ग्रंथामध्ये अशी कित्येक अनिर्णित तत्त्वे आढळतील की आधुनिक विज्ञानाला ती त्याही स्वरूपात गवसलेली नाहीत.

१७. हे सर्वांनाच मान्य आहे की, जेव्हा कोणताही धर्म विजयी होतो तेव्हा त्याचे काही आर्थिक मूल्य असते. जो धर्म आर्थिक प्रश्नांची नीट सोडवणूक करतो तो सत्ता प्राप्त करून घेतो. विज्ञानातही जे शोध आर्थिक लाभ करून देतात ते लोकांना आवडतात. विज्ञान आणि धर्म यांची या आर्थिक मूल्यावरूनची चर्चा कोणालाच अभिप्रेत नसावी.

१८. ताऱ्यांना आणि ग्रहांना चालविणारे नियम जाणणे ही फार मोठी आणि चांगली गोष्ट आहे; परंतु मानवाच्या मनोविकारांना, त्यांच्या भावनांना, त्याच्या इच्छाशक्तीला चालविणारे नियम जाणून घेणे त्यापेक्षा अनंतपट श्रेष्ठ आणि चांगले आहे. हे अंतर्मनाला वा मानवाच्या अंतःप्रकृतीला जिंकणे, मानवी मनात चालणाऱ्या सूक्ष्म क्रियांची रहस्ये जाणून घेणे, मानवी मनाविषयीचे अद्‌भुत गूढे जाणणे, त्याचे या विश्वाच्या पसाऱ्यातील शाश्वत स्थान समजावून घेणे ही सर्व धर्माची क्षेत्रे आहेत.

१९. धर्मापासून आपण जी काही भरीव तथ्ये आणि सत्ये शिकू शकतो व त्यापासून आपल्यावर जे काही शाश्वत - समाधान लाभू शकते ते अंमळ बाजूला ठेवले तरीही नुसते एक शास्त्र, नुसते एक अध्ययन या दृष्टीनेसुद्धा मानवाला उपलब्ध असलेल्या सर्व मानसिक व्यायामामध्ये धर्म हा सर्वांत श्रेष्ठ आणि निकोप व्यायाम होय. हा त्या अनंताचा धांडोळा, ही त्या अनंताला कवटाळण्याची धडपड, इंद्रियांच्या सीमारेषा ओलांडून जाण्याचा हा आटापिटा, जडाच्या शिवाराबाहेर पडण्याची ही खटपट आणि आपला अंतरात्मा आपणाला जाणवत असताना अनंतात विलीन करून त्याच्याशी एक होण्यासाठी अहर्निश चालविलेला हा प्रयत्न हाच खरोखर माणूस करीत असलेल्या सर्व उद्यमांमध्ये सर्वांत महान, सर्वांत उदात्त होय.

२०. आज जगात जे काही आहे -जे चांगले आहे, जे काही थोर

आहे, त्या साऱ्याचा अंतर्भाव भावी धर्मामध्ये व्हावयास पाहिजे आणि विज्ञानाप्रमाणेच पुढे आणखी विकास होण्याची त्या धर्मामध्ये अपरंपार शक्यता असावयास हवी, धर्मांनी समावेशक वृत्ती धारण केली पाहिजे. ईश्वराविषयीच्या त्यांच्या कल्पना इतरांच्याहून वेगळ्या आहेत एवढ्यासाठी त्यांनी तिरस्काराने एकमेकांना तुच्छ लेखता कामा नये. मी आपल्या आयुष्यात अशी किती तरी धार्मिक माणसे पाहिली आहेत, की ज्यांचा ईश्वरावर, आपण त्या शब्दाचा जो अर्थ करतो त्या अर्थाने मुळीच विश्वास नव्हता. कदाचित तुम्हा-आम्हाला कधी कळू शकला असेल त्यापेक्षा किती तरी चांगल्या रीतीने ईश्वर त्यांना कळला होता. सगुण ईश्वराची कल्पना किंवा निर्गुण अनंत, नैतिक नियम किंवा आदर्श मानव या साऱ्यांचाच धर्माच्या व्याख्येत अंतर्भाव झाला पाहिजे आणि धर्म ज्या वेळी असे विशाल, असे उदार होतील त्या वेळी लोकांचे भले करण्याचे त्यांचे सामर्थ्य शेकडो पटींनी वाढेल. आज मात्र धर्मांनी त्यांच्या ठायी प्रचंड शक्ती वसत असल्यामुळे जगाचे भले करण्यापेक्षा त्यांचे नुकसानच जास्त केले आहे आणि असे होण्याचे कारण म्हणजे त्यांचा संकुचितपणा आणि विशिष्ट सीमांमध्येच घुटमळत राहण्याची त्यांची प्रवृत्ती आणि आज विज्ञानाचेही असेच होते आहे.

२१. धर्म आणि आधुनिक भौतिक विज्ञान यांच्यात मिलाफ घडून यावयास हवा. हा मिलाफ घडून येण्यासाठी, या दोघांमध्ये असला समन्वय, असली एकवाक्यता साधण्यासाठी त्या दोघांनाही एकमेकांना काही सवलती द्याव्या लागतील. काही सवलती देताना त्यांना फार अवघडही जाईल, दुःखही होईल; परंतु या त्यागाने आपला लाभ झाला आहे, आपण समृद्ध झालो आहोत असेच त्या दोघांनाही आढळून येईल.

**(शोध स्वामी विवेकानंदांचा)**

❖❖❖

# ४.

# वैदिक परंपरेची घमेंड

**-आ. ह. साळुंखे**

***डॉ. आण्णासाहेब हरी साळुंखे (जन्म १९४३)*** *यांचा शेतकरी कुटुंबात जन्म. मराठीतील चिकित्सक लेखक, प्रसिद्ध विचारवंत, व्याख्याते आणि संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक आहेत. ग्रंथलेखन व व्याख्यानांतून पुरोगामी विचारांची मांडणी करीत परिवर्तनवादी चळवळी गतिमान केल्या. मराठी विश्वकोशात तुलनात्मक धर्मशास्त्र, संस्कृत या विषयांत शंभराहून अधिक नोंदींचे लेखन. इ. स. २००९ च्या महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक धोरण समितीचे अध्यक्ष.*

*आ. ह. साळुंखे यांच्या एकूण लेखनाला अभ्यासक, चिकित्सक संदर्भासह वस्तुनिष्ठ वैचारिक पुनर्मांडणीची मोठी परंपरा आहे. वैदिक परंपरेची काटेकोर चिकित्सा करीत वस्तुनिष्ठ ग्रंथाचे लेखन त्यांनी केले. मानवतावादी समाजक्रांतिकारक, लोकायत तत्त्वज्ञानाचे भाष्यकार, सत्यशोधकी प्राच्यविद्यापंडित व धर्मशास्त्राचे प्रगाढ पंडित म्हणून ते परिचित*

आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व विज्ञाननिष्ठा या मूल्यांचा प्रचार व प्रसार त्यांनी आपल्या वाणीतून देश-विदेशांतही केला. 'अस्तिक शिरोमणी चार्वाक,' 'एकलव्य,' 'शंबूक आणि झलकारी बाई,' 'गुलामांचा आणि गुलाम करणारांचा धर्म एक नसतो,' 'चार्वाकदर्शन,' 'विद्रोही तुकाराम,' 'धर्म की धर्मापलीकडे,' 'बळीवंश,' 'तथागत बुद्ध आणि संत तुकाराम,' 'सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्ध,' 'महात्मा फुले आणि धर्म,' 'महात्मा फुले आणि शिक्षण,' 'हिंदू संस्कृती आणि स्त्री,' 'शिवराय : संस्कार आणि शिक्षण,' 'महाभारतातील स्त्रिया भाग एक व दोन' आणि 'वादांची वादळे' अशी मोठी ग्रंथसंपदा त्यांनी लिहिली आहे.

आ. ह. साळुंखे यांच्या वैचारिक कार्याला अमेरिकेतील 'महाराष्ट्र फाऊंडेशन'चा साहित्य पुरस्कार, मुंबईचा 'महाकवि अश्वघोष जीवनगौरव' पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' पुरस्कार, सामाजिक कृतज्ञता निधीचा 'डॉ. राम आपटे' पुरस्कार, शिवाजी विद्यापीठाचा 'प्रतापसिंह महाराज (थोरले)' पुरस्कार इत्यादी पुरस्कार मिळाले आहेत. तसेच 'विचारवेध साहित्य संमेलना'चे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.

'आता आमच्या धडावर आमचेच डोके असेल !' या पुस्तकातून प्रा.श्रीनिवास दीक्षितांनी 'चार्वाकदर्शन' या ग्रंथावर घेतलेल्या आक्षेपांना डॉ. आ. ह. साळुंखे यांनी दिलेले उत्तर आहे. भारतीय वैदिक आणि अवैदिक संस्कृतीमध्ये सतत संघर्ष दिसून येतो. भारतीय संस्कृतीचा उगम वैदिक संस्कृतीत नसून अवैदिक संस्कृतीत आहे, हे लेखकाने सप्रमाण सिद्ध केले आहे.

---

## इतिहासाचे भान की लुच्चेपणा ?

'वेद' या शीर्षकाखाली प्रा. दीक्षित लिहितात, "वैदिकतेचा आणखी थोडा विचार येथे करूया. कारण डॉ. साळुंखे यांचे सबंध पुस्तक असे एक

चित्र उभे करते की भारताचा वैचारिक इतिहास म्हणजे वैदिकांची जीवनदृष्टी आणि लोकायतांची जीवनदृष्टी यांच्यात सतत चाललेल्या संघर्षाचा इतिहास होय. हे चित्र खरे नाही."

भारतीय संस्कृतीमध्ये झालेल्या संघर्षाविषयी माझी भूमिका काय आहे, हे येथे थोडे स्पष्ट करतो. येथे झालेला संघर्ष अत्यंत गुंतागुंतीचा आहे. येथे जसा आर्यांचा व अनार्यांचा संघर्ष झाला आहे तसाच आर्या-आर्यांचा व अनार्या-अनार्यांचाही संघर्ष झाला आहे. येथे जसा वैदिकांचा व अवैदिकांचा संघर्ष झाला आहे तसाच वैदिका-वैदिकांचा व अवैदिका-अवैदिकांचाही संघर्ष झाला आहे. या संघर्षाची संमिश्रता समजण्यासाठी एवढी उदाहरणे नमुना म्हणून पुरेशी आहेत. वैदिकांचा व लोकायतांचा संघर्ष हा अनेक संघर्षांपैकी एक आहे. संघर्षाचे बारीक-सारीक मुद्दे पाहायचे असतील तेव्हा हे सर्व तपशील पाहावे लागतीलच. असे असले तरी काही महत्त्वाच्या मुद्द्यांच्या बाबतीत वैदिक आणि अवैदिक असे संघर्ष करणारे दोन स्थूल प्रवाह दाखविता येतात.

या दोन प्रवाहांच्या बाबतीत माझ्या पुस्तकात मी जे काही म्हटले आहे, त्यातील काही वाक्ये येथे उद्धृत करतो, "अशा रीतीने एका बाजूला विजयी आर्यांमधील सत्ताधारी लोक आणि पराभूत अनार्यांमधील सत्तालोलुप लोक यांनी वैदिक परंपरा उभी केली. दुसऱ्या बाजूला तडजोड न करणारे अनार्य आणि आर्यांमधील अप्रतिष्ठित लोक यांची एक अवैदिक परंपरा उभी राहिली. मात्र या दोन परंपरा जशाच्या तशा शुद्ध व स्थिर स्वरूपात आजपर्यंत टिकलेल्या नाहीत. प्रतिष्ठितांना वर उचलून घेणे, प्रतिष्ठेसाठी वर जाण्याची धडपड करणे, अप्रतिष्ठितांनी खाली घसरणे वा त्यांना खाली ढकलणे या प्रक्रिया तेव्हापासून आजपर्यंत सुरूच आहेत.... वैदिक परंपरा वेदांचे नाव घेऊन आपले हितसंबंध जपत आलेली आहे आणि बहुजन समाजाची लौकिक परंपरा वेदांना फारसा मान न देणारी वा विरोध करणारी आहे."

प्रा. दीक्षितांनी याच परीक्षणात (पृ. २३) राजर्षि शाहू व संत तुकाराम यांचा निर्देश करून व्यक्त केलेल्या मताची या मुद्यांशी संबंधित असल्यामुळे थोडी चिकित्सा करूया. ते म्हणतात, .....डॉक्टर सांगतात की, "बहुजन समाजाची परंपरा वेदांना फारसा मान न देणारी व विरोध करणारी आहे. (२९) राजर्षि शाहू छत्रपतींची चळवळ डॉ. साळुंखे एका फटकाऱ्यात पुसून टाकीत आहेत. तुकोबांची परंपरा ही बहुजनांची परंपरा आहे याविषयी मतभिन्नता असू नये पण तुकारामांनी म्हटले आहे, "वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा, इतरांनी वाहावा भार माथा", ही काही वेदांना विरोध करण्याची रीत नव्हे.

**हा तर घोटाळा**

येथे प्रा. दीक्षितांनी केलेल्या एका घोटाळ्याकडे मी आधी लक्ष वेधतो. मी वापरलेला 'वा' हा शब्द बदलून प्रा. दीक्षितांनी तो 'व' असा केला आहे. या एका कान्यामुळे अर्थामध्ये खूप तफावत पडते, म्हणून हा निर्देश करणे भाग आहे. अवैदिक परंपरेतील काही लोक वेदांना विरोध करतात. पण प्रत्यक्ष विरोधही करीत नाहीत आणि फारसा मानही देत नाहीत, असे इतर काही लोक असतात, असे मी सुचविले आहे. प्रा. दीक्षित मात्र अवैदिक परंपरेतील सर्व लोक वेदांना विरोध करणारे असतात, असे माझे मत असल्याचे गृहीत धरून राजर्षि शाहू व संत तुकाराम यांची उदाहरणे देत आहेत. वस्तुतः अवैदिक परंपरेत वेदांकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन असू शकतात हेही माझ्या त्या विधानातून सूचित झाले आहे. संक्षेपाने लिहिलेल्या पुस्तकात असेच होते. खरे तर वैदिकांची परंपरा ही वेदांचे नाव घेऊन आपले हितसंबंध जपणारी आहे, असे म्हटल्यानंतर वेदांचा उपयोग हितसंबंध जपण्यासाठी न करणारे लोक वैदिक परंपरेत खऱ्या अर्थाने अंतर्भूत होऊ शकत नाहीत. स्वाभाविकच अवैदिक परंपरा त्यांना जवळची होते. राजर्षि शाहू आणि संत तुकाराम यांचा विचार या संदर्भात केला पाहिजे.

## शाहूंच्या दृष्टीने अवैदिक लोकच स्वकीय

प्रथम राजर्षि शाहूंचा विचार करूया. राजर्षि शाहू वेदांच्या अधिकारासाठी झगडत होते हा मुख्य मुद्दा प्रा. दीक्षितांच्या मनात आहे हे उघड आहे. या बाबतीत माझे म्हणणे असे -

१) राजर्षीचा संघर्ष प्रत्यक्ष रीत्या वेदांविषयीच्या आदरातून झालेला होता, असे म्हणण्यापेक्षा त्यांना वेदांचा अधिकार नाकारणाऱ्या ब्राह्मणांनी त्यांची अस्मिता दुखावल्यामुळे आम्हांलाही अधिकार आहे, तो नाकारणारे तुम्ही कोण इत्यादी प्रकारची प्रतिक्रिया त्यांच्या या संघर्षातून व्यक्त झाली, असे म्हटले पाहिजे. ती वैदिकत्वाची द्योतक आहे, असे मी तरी मानत नाही.

२) वैदिक परंपरा वेदांच्या आधारे हितसंबंध जपणारी आहे, असे मी मानतो. स्वाभाविकच राजर्षी हे या अर्थाने वैदिक ठरू शकत नाहीत.

३) ज्यांना वेदांचा अधिकार नाकारण्यात आला होता ते कोणत्या अर्थाने वैदिक होते, असे म्हणायचे ? वैदिकांची बौद्धिक व मानसिक गुलामगिरी करणारे या अर्थाने ?

४) पण या सर्वांपेक्षा अधिक महत्त्वाचा असा एक मुद्दा आहे. राजर्षि शाहू वेदांच्या अधिकारासाठी संघर्ष करीत असले तरी ते खऱ्या अर्थाने वेदांना मानत होते, असे म्हणता येईल का? वेदांना मानणे म्हणजे काय? वेदांना मानणे याचे दोन अर्थ होऊ शकतात - **अ)** वैदिक परंपरा बाजूला ठेवून वेदांचे स्वतंत्र मूल्यमापन करून त्यातील चांगल्या भागाला मानणे. या अर्थाने मीही स्वतःला वैदिक म्हणायला तयार आहे. **आ)** वैदिक परंपरेचे वेदांना मानण्याविषयीचे काही निकष आहेत. ते मानणारालाच वैदिक म्हणता येईल. ते निकष लावले तर शाहू महाराज वैदिक ठरतात का, हे पाहायला हवे. हे निकष लावले, तर इतर बाबींचे सोडाच पण शाहूंनी वेदांच्या अधिकारासाठी भांडणे हेच मुळी त्यांच्या वैदिकत्वाला छेद देणारे आहे. त्यांनी वेदांचा अनादर केला, असे दाखविणारे आहे. वैदिकतेला

विरोध करणारे आहे. वैदिक परंपरेनुसार कलियुगात ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण होते. स्वाभाविकच शाहू शूद्र असल्यामुळे त्यांना वेदांचा अधिकार नव्हता. शाहूंना या परंपरेविषयी खरोखर आदर असता तर त्यांनी ब्राह्मणांचे निमूटपणे ऐकून वेदांचा अधिकार मागण्याचा नाद सोडून द्यायला हवा होता. याचा अर्थ वेदांचा अधिकार सोडला तर वेदांचा मान राखला जातो आणि अधिकार मागितला तर वेदांचा अनादर होतो. शाहूंनी अधिकार मागितला हे तर उघड आहे.

५) वैदिक परंपरेला छेद देणाऱ्या इतरही अनेक गोष्टी शाहूंनी केल्या. वेदांचा अधिकार नसलेल्या लोकांना त्यांनी तो अधिकार दिला. क्षात्र जगद्‌गुरूचे पद निर्माण करणे हे काय वैदिक परंपरेत बसते ? अस्पृश्याच्या हॉटेलमध्ये जाणे हे काय वैदिक परंपरेत बसते ? हे वैदिक परंपरेप्रमाणे पौरोहित्य फक्त ब्राह्मणालाच करता येते. शाहूंनी या बाबतीत किती कठोर निर्णय घेतला, त्याचे फक्त एक उदाहरण देतो. त्यांनी २१ डिसेंबर १९२० रोजी आपल्या महाराणींना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, "जर तुम्ही माझ्या निष्ठावंत पत्नी असाल तर तुमचे सर्व ब्राह्मणी पुरोहित काढून टाकावेत व क्षत्रिय पुरोहितांकडून आपली धार्मिक कृत्ये करून घ्यावीत. या निश्चयापासून रेसभरही ढळू नका." अशाच तऱ्हेची पत्रे त्यांनी आपली सून, वहिनी, भाऊ व मुलगी यांना लिहिली होती.

राजर्षि शाहूंनी वैदिकतेच्या अनेक कसोट्या नाकारल्या असल्यामुळे 'वेदांना फारसा मान न देणारी वा विरोध करणारी' अवैदिक परंपरा शाहूंना जवळची ठरते, स्वकीय ठरते.

राजर्षि शाहूंची चळवळ वेदांविषयीच्या पूज्यभावातून निर्माण झाली होती असे मुळीच नाही. वेदाचे नाव घेऊन काही उन्मत्त वैदिकांनी राजर्षीना वेदांचा अधिकार नाकारला होता. हा अपमान केवळ त्यांच्या एकट्यांचा होता, असेही नाही. वेदांच्या आधारे संपूर्ण ब्राह्मणेतर समाजाच्या मानवी प्रतिष्ठेलाच सुरुंग लावण्यात आला होता. शाहू महाराजांची चळवळ ही या

अधम कृत्याच्या विरोधात होती. त्यामुळे मी त्या चळवळीच्या विरोधात असण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. वेद शिकायला मनाई केल्यामुळे शूद्रांना विद्येपासून वंचित केल्यासारखे होत नाही असे म्हणून प्रा. दीक्षितांनीच शाहूंच्या चळवळीचा अपमान केला आहे.

**वेदांचा अंकित नसल्याची गर्जना**

आता संत तुकारामांकडे वळूया. तुकारामांचा अभंग लिहिण्याचा अधिकार वेदांच्याच आधारे नाकारण्यात आला. त्यांची गाथा बुडविण्यात आली. त्यांचा अपार छळ करण्यात आला आणि अवघ्या ४२ व्या वर्षी त्यांना मृत्यूच्या गुहेत ढकलण्यात आले. हे सगळे त्यांना वेदांचा अधिकार नाही, या सिद्धाताच्या आधारे करण्यात आले. या दोन्ही महापुरुषांची अशी विटंबना करण्याचे प्रयत्न वेदांच्याच आधारे करण्यात आलेले असताना जणू काही ते दोघे वैदिक मार्गाचेच निष्ठावंत अनुयायी होते आणि अवैदिकतेचा पुरस्कार करणारे साळुंखे त्या दोघांना कमीपणा आणत आहेत, असा आभास निर्माण करण्याची धूर्तता प्रा. दीक्षित दाखवीत आहेत. त्यांनी तुकारामांचे जे वचन उद्धृत केले आहे तेही वेदांचा गौरव करणारे नव्हे तर वेदांचा अर्थ जाणून न घेता वेदांचे नुसते पाठांतर करून घमेंड बाळगणाऱ्या लोकांवर तिखट टीका करणारे आहे. नाही तरी माझ्यासारख्यांचाही असलेला विरोध प्रामुख्याने वेदांना नाही तर शोषणासाठी वेदांचा वापर करणाऱ्या परंपरेला आहे. वैदिक परंपरेवर तुकारामांनी अनेक वेळा हल्ला केला आहे. त्यातील काही वचने पाहण्यासारखी आहेत -

१) घोडे काय थोडे वागविते ओझे।
भावेविण तैसे पाठांतर ।।

२) कोडीयाचे गोरेपण । तैसे अहंकारी ज्ञान ।।

३) विद्या अल्प परी गर्व शिरोमणी।
मजहुनी ज्ञानी कोण आहे ।।

४) संतांचा महिमा तो बहुदुर्गम ।

Presented Books
Dayanand College Of Arts, Latur
ACC. No.............
Date.....................
LIBRARY

शाब्दिकांचे काम नाही येथे ।।
५) तुका तरी सहज बोले वाणी।
त्याचे घरी वेदांत वाहे पाणी ।।
६) घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हाती ।।

पण या सर्व वचनांपेक्षाही अत्यंत महत्त्वाचे असे तुकारामांचे एक वचन आहे. ते म्हणतात, 'सिद्धीचा दास नव्हे श्रुतीचा अंकिला।' श्रुती म्हणजे वेद आणि येथे तुकाराम आपण वेदाचे अंकित नसल्याचे निःसंदिग्धपणे सांगत आहेत. जो वेदांचा अंकित नसतो त्याला वैदिक परंपरा वैदिक मानत नाही. ती त्याला नास्तिक मानून बहिष्कृत करायला सांगते हे मुद्दाम ध्यानात घ्यायला हवे. तात्पर्य, राजर्षि शाहू आणि संत तुकाराम यांच्या नावांचा वापर करून वैदिक परंपरेचा गौरव करण्याचा प्रा. दीक्षितांचा हेतू सफल होऊ शकत नाही. संत तुकारामांवरील माझ्या स्वतंत्र पुस्तकात मी याचे अधिक विवेचन करणार आहेच.

**भारतीय संस्कृतीचा उगम वेदात ?**

आता मूळ मुद्याकडे वळूया. वैदिक आणि लोकायत यांच्यातील संघर्षाबद्दलची माझी मते नाकारताना प्रा. दीक्षित लिहितात, "आजच्या भारतीय संस्कृतीचा उगम वेदात आहे हे खरे असले तरी आजच्या आमच्या संस्कृतीत वैदिक अंश फार थोडा आहे. मच्छलीपट्टणास समुद्रास मिळणाऱ्या कृष्णा नदीच्या पाण्यात महाबळेश्वरला उगमापाशी पडणाऱ्या पावसाचा जेवढा अंश असेल तेवढीही मूल स्रोतातील वैदिकता आज आमच्या संस्कृतीत नाही. यज्ञप्रधान किंबहुना यज्ञसर्वस्व असा श्रौत धर्म जैनाचार्यांनी आणि बौद्धाचार्यांनी संपवून टाकला. 'यागादिरेव धर्मः' असे म्हणत मीमांसकांनी त्याचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला पण ज्ञानमार्ग की कर्ममार्ग की ज्ञानकर्मसमुच्चय अशा तऱ्हेचे विकल्प निर्माण करून शंकराचार्यांनी मीमांसकांचा प्रयत्न पुसून टाकला. 'मी म्हणत आहे ते सर्व वेदात सांगितले आहे' असे वारंवार म्हणत (My lady protests too

much) बौद्ध मत हे वेदान्त या नावाखाली शंकराचार्यांनी या देशाच्या इथॉसचा भाग बनविला. तथागत म्हणाले होते, "अनुभवाच्या रसायनातून 'मी' आणि 'माझे' गाळून टाका. जे उरेल ते निर्वाण होय, मी ते अनुभवले आहे." शंकराचार्य म्हणाले, "अहंकाराचा लोप करून निवळ साक्षित्वाचा अनुभव घ्या, तेच शाश्वत आत्मतत्त्व होय." दोघांमधील फरक फक्त परिभाषेचा आहे, आशयाचा नाही. धर्माचा गाभा नैतिकतेत आहे हे बौद्ध मत संतांच्या - माध्यमाच्या द्वारा आजच्या भारतीय विचारधारेत मान्यता पावलेले आहे. हा विचार वैदिक नव्हे. आजचा हिंदू बहुंशाने बौद्ध व अल्पांशाने वैदिक आहे." (पृ. २९-३०)

**स्वतःला बौद्ध म्हणून जाहीर करा ना !**

आजच्या भारतीय संस्कृतीचा उगम वेदात आहे हे प्रा. दीक्षितांना खरे वाटत असले तरी ते प्रत्यक्षात खरे नाही. वेदांच्याही आधी एक समृद्ध अशी सिंधू संस्कृती येथे नांदत होती. एवढेच नव्हे तर भारतीय संस्कृतीची सिंधू संस्कृतीच्याही आधीची मुळे सापडू शकतात. म्हणूनच वेद हे भारतीय संस्कृतीचे उगमस्थान असल्याचे सांगणे ही चक्क दिशाभूल आहे. याच परिच्छेदात त्यांनी म्हटले आहे की, धर्माचा गाभा नैतिकतेत आहे हे बौद्धमत आहे, वैदिक नव्हे. या बौद्ध मताचा उगम वेदपूर्व अनार्य काळात झालेला आहे. जैन मताचाही उगम वेदपूर्व काळात झाला आहे, असे हल्लीचे सर्वसामान्य मत असल्याचे डॉ. रा. ना. दांडेकर सांगतात. दुसऱ्या एका संदर्भातील डॉ. दांडेकरांचे मत फार जुने म्हणून प्रा. दीक्षितांनी उडवून लावले आहे पण बौद्धमताविषयीचे वरील मत तर डॉ. दांडेकरांनी १९९२ साली मांडले आहे. आता बौद्धमत इतके नैतिक आहे आणि आजच्या हिंदूंच्या व्यक्तित्वात वैदिकत्वापेक्षा ते अधिक रुजलेले आहे, असे स्वतःच सांगणाऱ्या प्रा. दीक्षितांना भारतीय संस्कृतीचा उगम वेदात नसून वेदपूर्व काळातील बौद्धमतात आहे, असे का बरे म्हणावेसे वाटत नाही ? कारण स्पष्ट आहे. जीव वैदिकत्वात गुंतला आहे. अहंकार वैदिकत्वामुळे पुष्ट

होतो आणि बौद्धमताची स्तुती तोंडदेखली आहे. अशा स्थितीत बुद्धांना विष्णूचा अवतार मानणे हा लुच्चेपणा नाही हे कशाच्या जोरावर मान्य करावे ? आजचा हिंदू बहुंशाने बौद्ध आहे, या इतिहासाचे प्रा. दीक्षितांना खरोखरच भान ठेवायचे असेल तर त्यांनी स्वतःला बौद्ध म्हणून जाहीर करावे. जी तुमची अस्मिता आहे, आयडेंटिटी आहे, ती मान्य करण्यात तुम्हांला लाज वा संकोच वाटण्याचे कारण नाही. प्रा. दीक्षित असे करणार असतील तरच त्यांची ती भावना सच्ची म्हणता येईल आणि त्यांच्यासारख्या अभ्यासकांनी हे सत्य जाहीर केले तर इतर लोकही ते स्वीकारण्यास पुढे येतील.

**बुद्ध ब्राह्मणेतर म्हणून**

शंकराचार्यांच्या संदर्भात त्यांनी येथे जे काही म्हटले आहे ते मलाही स्थूलमानाने मान्य आहे. गौतम बुद्धांचे स्वतःचे तत्त्वज्ञान व नंतरच्या बौद्धांचे विचार यांत पडलेला फरक लक्षात घेतला पाहिजे म्हणून मी 'स्थूलमानाने' असे म्हणतो पण प्रा. दीक्षितांनी हे सगळे केव्हा तरी ब्राह्मणांच्या एखाद्या सभेत मांडावे आणि त्या सभेनंतर काय काय होते हे अख्ख्या महाराष्ट्राला सांगावे. काही अपवाद वगळता इतर ब्राह्मणांनी गौतमबुद्धांचा अंतःकरणापासून कधीही स्वीकार केलेला नाही. ब्राह्मणी अहंकाराची गंमत पाहा ! आशयाच्या दृष्टीने बौद्धांचेच तत्त्वज्ञान फक्त परिभाषा बदलून शंकराचार्यांनी सांगितले. स्वतः प्रा. दीक्षितच हे सांगतात. गौतमबुद्ध सुमारे दीड हजार वर्षे शंकराचार्यांच्या आधी होऊन गेले. याचा अर्थ त्यांनी तो आशय शंकराचार्यांकडून घेतला, असे म्हणता येत नाही. पण या दोघांना ब्राह्मणांकडून मिळणाऱ्या वागणुकीत जमीन अस्मानाचे अंतर आहे. शंकराचार्य गौतमबुद्धांच्या पासंगालाही पुरणार नाहीत. कारण प्रा. दीक्षितांच्याच म्हणण्यानुसार त्यांनी बोलूनचालून उसनवारी केली पण या देशात रामायणासारख्या ग्रंथात गौतमबुद्धांना चोर म्हणून हिणवणारा भाग ब्राह्मणांनी घुसडला, बुद्धांमुळे राष्ट्र बुडाल्याचा गवगवा केला. याउलट शंकराचार्य हे

न्यूटन व आईन्स्टाईन यांच्यापेक्षाही प्रतिभाशाली असल्याचा गौरव केला जातो. हे असे का ? बुद्ध ब्राह्मणेतर होते, त्यातही ब्राह्मणांच्या ओंजळीने पाणी न पिणारे ब्राह्मणेतर होते आणि शंकराचार्य मात्र ब्राह्मण होते आणि एखाद्या ब्राह्मणेतराने हिमालयाएवढे कर्तृत्व गाजवले तरी या देशातील ब्राह्मणांच्या दृष्टीने ते तृणवत असते हेच यामागचे कारण होय.

**हे काय संघर्षाखेरीज झाले?**

माझे सबंध पुस्तक एक चुकीचे चित्र उभे करते, असे प्रा. दीक्षितांचे म्हणणे आहे. वैदिकांची जीवनदृष्टी आणि लोकायतांची दृष्टी यांच्यात सतत संघर्ष चालल्याचे माझे म्हणणे खरे नाही, असे त्यांना वाटते. आमच्या वैदिक संस्कृतीत वैदिक अंश फार थोडा राहिला आहे, असेही ते म्हणतात. जैन व बौद्ध यांनी यज्ञप्रधान धर्म संपवून टाकला, असेही ते म्हणतात. या बाबतीत माझे म्हणणे असे - लोकायतांनी वैदिकांबरोबर संघर्ष केला असला तरी लोकायत हे वैदिकांशी संघर्ष करणाऱ्या अनेकांपैकी एक होते. याविषयी मी पूर्वी लिहिले आहेच. वैदिकांबरोबर संघर्ष करणारे लोकायतांखेरीज अवैदिक असे इतरही अनेक जण होतेच. आता या देशातील यज्ञधर्म संपवून टाकला गेला हे काय संघर्षाखेरीज झाले? आज आपल्या संस्कृतीत वैदिकतेचा अंश फार थोडा आहे, असे प्रा. दीक्षित म्हणतात. ही स्थिती वैदिकांनी स्वेच्छेने स्वीकारली आहे काय? अवैदिकांनी वारंवार हल्ले केल्यानंतर वैदिकतेचे व यज्ञधर्माचे समर्थन करणे कठीण झाले आणि म्हणूनच वैदिकांना या गोष्टींचा त्याग करावा लागला. तरीही तुम्ही संघर्ष झाल्याचे नाकारता ?

**दूध कोण ? साखर कोण ?**

या परिच्छेदाच्या अखेरीस प्रा. दीक्षित म्हणतात, "आजचा हिंदू बहुंशाने बौद्ध व अल्पांशाने वैदिक आहे. बुद्धानुयायी व बौद्ध धर्म येथून परागंदा झाले नाहीत. ते येथेच मुरून राहिलेले आहेत. दुधात विरघळलेली साखर जशी निराळी काढून दाखविता येणार नाही तसा बौद्ध धर्म हिंदूंच्या

धार्मिकतेपासून वेगळा काढून दाखविता येणार नाही. बुद्धाला विष्णूचा नववा अवतार म्हणण्याचा आशय हा आहे. तसे म्हणण्यात लुच्चेपणाचा भाग नसून इतिहासाचे भान आहे." दुधात विरघळलेल्या साखरेचे प्रा. दीक्षितांनी दिलेले उदाहरण चुकीचे आहे. कारण साखर दुधात विरघळल्यानंतर पाहणाराला हे काय आहे म्हणून विचारले तर हे दूध आहे असे तो म्हणेल, साखर आहे असे तो म्हणणार नाही. याचा अर्थ दुधाचे अस्तित्व स्पष्टपणाने शिल्लक राहते आणि साखरेचे अस्तित्व विरघळून गेल्यावर स्पष्टपणाने दिसत नाही. आता बौद्ध धर्मामध्ये जर नैतिकता होती तर बौद्ध धर्माला दुधाचे स्थान देऊन वैदिक धर्माला साखरेचे स्थान का दिले नाही ? बुद्धाला विष्णूचा अवतार मानण्यात लुच्चेपणाचा भाग नसून इतिहासाचे भान आहे, असे प्रा. दीक्षित म्हणतात. खरे म्हणजे यात लुच्चेपणाचा भाग आहेच. तसे नसते तर नैतिकतेचा उपदेश करणाऱ्या बुद्धांना सर्वश्रेष्ठ मानून विष्णू वगैरेंना त्यांचे अवतार का मानले नाही ? वैदिकांचा समन्वय इतरांना गिळंकृत करून टाकणारा असतो हेच यावरून स्पष्ट होते. समन्वयानंतरही आपलेच वर्चस्व राहिले पाहिजे आणि त्यासाठी पाहिजे त्या प्रकारच्या युक्त्या केल्या पाहिजेत, अशी वैदिकांची चाल होती.

**(आता आमच्या धडावर आमचेच डोके असेल !)**

❖❖❖

# ५.

# शिक्षणाच्या प्रवाहात

**-रामराजे आत्राम**

***रामराजे गंगाराम आत्राम (जन्म १९६२)*** *हे आदिवासी बहुजन वंचितांच्या प्रश्नांवर लेखन करणारे व सामाजिक परिवर्तनासाठी संघर्ष करणारे कृतिशील कार्यकर्ते आहेत. चळवळीतील तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या समग्र साहित्यातून प्रकट केले आहे. आदिवासी म्हणून जगताना सभोवतालच्या आदिवासी समाजाचे पाहिलेले व स्वतः अनुभवलेले दुःख, व्यथा, वेदना आणि विविध प्रश्न त्यांनी आपल्या लेखनातून मांडले आहेत. त्यांचे साहित्य कल्पनेला थारा न देता सरळ प्रश्नांना भिडते. या दृष्टीने ते वास्तववादी लेखक ठरतात. 'नवं लुगडं,' 'मसणवटा,' 'अरे माणसा तू कधी होशील माणूस?' हे त्यांचे कथासंग्रह, 'वासना,' 'भूक,' 'प्रतिष्ठा,' 'सत्यासाठी रक्ताचे नाते ठोकरले,' या कादंबऱ्या, 'उघडा दरवाजा' हे आत्मचरित्र, 'भारतीय मुस्लिम समज-गैरसमज व वास्तव,' '२१ व्या शतकातील आदिवासी आणि त्यांच्यासमोरील आव्हाने,' 'चळवळी परिवर्तनाच्या' हे वैचारिक साहित्य इत्यादी त्यांची साहित्यसंपदा प्रकाशित आहे.*

*प्रस्तुत उतारा त्यांच्या 'उघडा दरवाजा' या आत्मचरित्रातून घेतला असून त्यातून आदिवासी समाजाला शिक्षणासाठी कराव्या लागणाऱ्या यातायातीचे अत्यंत दाहक वास्तव व्यक्त झाले आहे.*

---

माझी 'माँ' अनाडीच होती. अक्षरांची अन् तिची कधी भेट झालीच नव्हती. तरीपण जग ओळखणारी आणि भविष्य जाणणारी होती. जग कुठं चाललंय हे ओळखणारी होती. शिकली नव्हती पण तिच्या जवळ विचार होता. दूरदृष्टीपणा होता. माँ माझ्याविषयी विचार करीत होती. तिनं निर्धार केला. माझ्या चुलत मामाला बोलावून घेतलं, कारण तो थोडा शिकला होता. यामुळे हुशार होता. नाव त्याचं राजाराम, सख्खा मामा थोडा भोळसट होता. तेवढे जग जाणत नव्हता. म्हणून माँ ने चुलत मामा राजाराम याला बोलावून घेतलं अन् म्हणाली, 'राजन्ना' बाबा जग पुढं झपाट्यानं चाललंय, शिक्षणाचं पेव चवकडं फुटलंय. आगुदरची लेकरं तर शिकली नाहीत, रामला शाळेत घालावं म्हणते, त्याला शिक्षण शिकविण्याची माझी लई इच्छा हाय. कारडं वाचाय, लिहाय पुरतं तरी त्याला बी शिक्षण घेणं गरजेचं हाय, त्याच्या नशिबानं शिकलं तर तोबी लई शिकल, बॅलिस्टर होईल. तसाच अनाडी राहिला तर त्याला शिकलेली बायकू मिळाली तर माझ्या नावानं बोटं मोडल आणि बायकोनं पत्र लिहिल्यावर लोकांच्या मोहरं एवढं कारडं वाचून दाखवा म्हणून शिकलेल्या लोका म्होरं पोराला तोंड पसरावं लागल. तुझा माझा जमाना गेला, आता शिक्षणाला जास्त महत्त्व आहे. तर राजन्ना, रामला तुझ्या ओळखीनं शाळेत घाल बाबा'.

दुसऱ्या दिवसापासनं आम्ही शाळेत दाखल झालो. कपड्याच्या नावाखाली इथून तिथून अंगात एकच सदरा होता. मध्ये सगळं आकाश उघडच होतं. मेहकरला चावडीत शाळा भरत होती. मास्तरानं सगळ्यांना मांडी घालून बसण्याचं फरमान सोडलं. सगळे मांडी घालून बसले. मीही

मांडी घातली. सगळी पोरं हसू लागली, मीही हसू लागलो. सगळे माझ्याकडे बघून हसत असल्यामुळे मास्तर पुढे सरसावले, का हसताय? म्हणून सर्वांना दरडावलं. तर सारी माझ्याकडंच बघत होती. मास्तरानंही माझ्याकडं बघितलं तर माझा सदरा समोरून पूर्ण फाटलेला होता. यामुळं खिडकीतनं मधला सगळा आवार दिसत होता. तसे मास्तरही हसले, मी मात्र गप गुमान, निर्विकार, शांत बसलो होतो. त्याचं मला काहीच वाटत नव्हतं. उलट त्या मुलांचीच मला कीव वाटत होती. ती मुलं संकुचित बुद्धीची दिसत होती. मास्तर खाली वाकले. माझा तो फाटलेला सदरा समोरून घडी घालून त्याला दुमडलं आणि मला पिंढरीखाली धरायला सांगितलं.

शाळेतला पहिला दिवस होता. मास्तरानं, 'ओनामा शिधम्' येथून सुरुवात केली. एक ते दहा पर्यंत आकडे बोर्डावर लिहिले. एका बाजूला अ, आ, ई लिहिलं आणि आम्हा सर्वांना आपापल्या पाटीवर बोर्डावर बघून लिहिण्यास सांगितले. तसा मी तात्काळ पाटीवर सर्व लिहून काढलं. ओळीत नव्हतं, पण सगळं लिहिलं होतं. सर्वांच्या आगुदर मास्तराला नेहून दाखविलं. तसं मास्तरानं बारकाईनं बघितलं, गालात हसलं आणि पाटीवर काही सरळ रेषा ओढल्या आणि मला म्हटलं, या दोन रेषांमध्ये एक ते दहा सरळ नीट उजळणी काढायची. तसेच या आडव्या रेषेच्या खालून नीट बाराखड्या काढायच्या. मी जागेवर येऊन बसलो. परत मास्तरानं सांगितल्याप्रमाणे दोन रेषांत मोठ्यानं उजळणी काढली. आडव्या रेषेच्या खालून नीट बाराखड्या काढल्या. पाच मिनिटात मास्तराला नेहून दाखविलो. मास्तरानं 'शाब्बास' म्हणून पाठ थोपटली. त्या पोरांनी आणखी काढलंच नव्हतं. मी सर्वांत मागे होतो. मास्तराने मला माझी हुशारी बघून सगळ्याच्या मोहरं आपल्या जवळच बसवून घेतलं, शाळा सुटली. सगळेच जण माझी घरी आतुरतेने वाट बघत होते. घरी गेल्या-गेल्या माझ्या मॉंन माझे पटापटा पापे घेतले. पाण्यानं माझे हातपाय, तोंड धुतले. मायेनं जेवण घातलं. सारेच विचारीत होते, शाळेत काय झालं? मास्तरानं काय म्हटलं? मी

पाटी काढून दाखवली. सगळ्यांनी डोळे भरून बघितलं. माँ पाटी हातात घेऊन मोठ्या कौतुकानं पाटीकडं व मी लिहिलेल्या उजळणी, बाराखड्याकडं बघत होती. माँ जाम खुश झाली होती. आमच्या अगोदरच्या सात पिढ्यात शाळा कोणीही शिकलं नव्हतं. शाळेत शिकणारा मी पहिला होतो. माँनं परत पाटीकडे आणि माझ्याकडं मोठ्या कौतुकानं बघितलं व शांत बसली. न जाणो मनात काय विचार करीत होती?

माझी नियमित शाळा सुरू झाली होती. माँनं मला शाळेसाठी एक नवा डरेस आणला होता. डरेस घालून मी शाळेत बसलो होतो. सारी पोरं माझ्याकडं आश्चर्यानं बघत होती. कारण मी कालच्यापेक्षा आज वेगळा दिसत होतो. मास्तरानं मला सगळ्यांच्या मोहरं बसविलं होतं. मास्तर म्हणाला, कालचा अभ्यास दाखवा, काल मी तुम्हाला काय शिकविलं ते सारं परत पाटीवर लिहून मला दाखवा. गलका एकदम बंद झाला. सर्वजण हात चोळीत बसले. दहा-पाच पोरं लिहायचा प्रयत्न करीत होती. मी पाच मिनिटात मास्तरानं सांगितल्यानुसार सारं आठवून अभ्यास पाटीवर लिहिला. सारं नीटनेटकं व सरळ लिहिलं होतं. माझ्या अगोदर कोणी तरी लिहून मास्तराला दाखविल असं वाटलं, परंतु जागेवरून कोणीच उठलं नाही. शेवटी सर्वांत अगोदर मीच उठलो. मास्तराला पाटी दाखविली. मास्तरानं सारं तपासलं. सारं बरोबर आलं होतं. माझ्या नंतर एक पोरगा उठला. पाटी मास्तराच्या मोहरं धरली. मास्तरानं पाटी पाहिली आणि पोराच्या पाठीमागे एक थापड लगावली. त्या पोराचं सगळंच चुकलं होतं. या पोराला मारलेलं बघून सारी पोरं घाबरली. जागेवरून एकही उठत नव्हतं. याचाच अर्थ काल मास्तरानं शिकवलेलं मला सोडून कोणाच्याच ध्यानात नव्हतं. मास्तरानं सगळ्याच्या पाट्या जागेवर जाऊन तपासल्या, कोण चुकलं होतं, कोणी पाटीवर लिहिण्याचा नुसताच प्रयत्न केला होता. कोणी पाटीवर काहीच काढलेलं नव्हतं, मास्तर जागेवर आले, सर्वांकडे एक कटाक्ष टाकला. परत बोर्डावर कालच्याप्रमाणं सारं लिहिलं आणि साऱ्यांकडून

जबरदस्तीनं पाटीवर लिहून घेतलं. सोबत पाटीत बदडणं होतं. तरी पोरं नीट लिहित नव्हती. मास्तरानं सर्वांना जागेवरच मांडी घालून नीट बसण्यास सूचना केली आणि एका एकाला जवळ बोलावून आपल्या स्वतःच्या हातानं पाटीवर सुंदर अक्षरावर गिरविण्यास सांगितलं.

अशा पद्धतीनं आमची शाळा सुरू झाली होती. पंधरा दिवसात उजळणी व बाराखड्याचं पुस्तक मास्तरानं माझ्या हातात दिलं होतं. मी सगळी बाराखडी, उजळणी पंधरा दिवसात संपूर्ण अभ्यासली होती. मला अक्षर फुटत होती. त्यात लिहिलं होतं. 'छगन लवकर उठ, दात घास, हात पाय तोंड पाण्यानं साफ कर, स्नान कर व आई-बाबांच्या पाया पड' ते वाचून मीही लवकर उठायला सुरुवात केली. आंघोळ करून माँच्या पाया पडायचो. बा जवळ नव्हता. येथूनच त्यांची आठवण करून हात जोडायचो व त्यानंतर अभ्यासाला बसायचो. हा माझा आता नित्यक्रम झालेला होता. बघता बघता वर्ष संपले, परीक्षा झाल्या.

बा इकडून तिकडून कमवून आणत होता. मधल्या कालावधीत बापुराव आण्णाचं लगीन झालं होतं. त्याचा तो वायलं होता. आपली बायको घेऊन बाजूला झाला होता. बहिणीचंही लगीन झालं होतं. यामुळे कुटूंबाचा थोडा भार कमी झाला होता. आम्ही दोन भाऊ शेषेराव आण्णा व मी, माँ आणि बा एवढंच कुटूंब होत. मी निलंग्यात फिरत होतो. आम्हाला जवळ करणारी माणसं म्हणजे या देशाचे वतनदार महार, मांग मंडळी आणि येथील मुसलमान व भटक्यांचे वडार, कैकाडी यांच्या समवयस्क पोरांसोबत मी बोंबलत फिरायचो. कधी मासे धरायला जायचो, कधी खेकडे धरायचे. माळावर गेलो की, खिळपटातून, जमिनीच्या भळीतून घोरपडी धरायचो. माझ्यासोबत कैकाड्याचा विलास माने, त्याचा भाऊ शिवाजी माने, महाराचा दिलीप कांबळे, मुसलमानाचा पाशा, मांगाचा सुग्रीव इत्यादी राहायचे. असा हा आमचा उपक्रम चालू होता.

तत्पूर्वी या देशात क्रांती घडली होती. १५ ऑगस्ट १९४७ ला देश

गुलामगिरीतून स्वतंत्र झालेला होता. या भारत देशाची घटना एका महामानवाने, देशाच्या सच्च्या भक्तानं म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिली होती. या घटनेद्वारे या भारत भूमीवरील दीन-दलित, आदिवासी, भटक्या विमुक्तांना येथील अल्पसंख्यांकांना घटनेच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला होता. बाबासाहेबांनी घटनेतून न्याय दिला म्हणून तर मी आज हे माझे आत्मचरित्र लिहून छापतोय. हजारो वर्षे मनुवाद्यांनी लोटलेल्या अंधश्रद्धेत खितपत पडलेल्या, कर्मकांडात अडकलेल्या व सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय यासारख्या महत्त्वाच्या घडामोडींपासून वंचित असलेल्या या दरिद्री माणसांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हक्क मिळवून दिलेला होता. शिक्षणाची दारे खुली केलेली होती आणि म्हणून येथील काही माणसांनी, शैक्षणिक संस्था उघडून शाळा सुरू केलेल्या होत्या. त्यांच्या शाळेत सवर्णांच्या पोरांचा भरणा झाला होता. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहिल्याप्रमाणे मागासवर्गीय, दलित, आदिवासी आणि भटक्या विमुक्तांच्या पोरांना शाळेत प्रवेश दिल्याशिवाय शाळांना मान्यता मिळणार नव्हती. शाळेला अनुदान मिळणार नव्हतं. यामुळे त्या शाळेतील मास्तर मागासवर्गीय, आदिवासी पोरांच्या शोधात फिरत होते. मी आपला इथून तिथून एकच फाटका सदरा अंगात घालून फिरत होतो. १९७२ चा काळ असावा.

डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकरांनी महाराष्ट्र प्राथमिक विद्यामंदिर, महाराष्ट्र महाविद्यालय इत्यादी शैक्षणिक संस्था उघडल्या होत्या. प्राथमिक शाळेत पोरं पाहिजे होती. शाळा दाबका वेशीच्या विठ्ठल-रूक्मिणीच्या मंदिरात भरत होती. 'गोविंदराव फाटे' नावाचे स्वातंत्र्य सैनिक या महाराष्ट्र प्राथमिक विद्यामंदिर शाळेचे मुख्याध्यापक होते. सडपातळ, उंच बांधा, धोतर, खमीस, त्यावर खादी रंगाचा जॉकेट, डोक्यावर टोपी असा पेहराव. मी असा महार, मांग, वडार, कैकाडी यांच्या पोरांसंग मोकाट फिरायचो. गोविंदराव फाट्यांनी मला असं फिरताना पाहिलं होतं. त्या साऱ्या पोरांत

सर्वात काळा आणि उठून दिसणारा मीच होतो आणि मी हरणासारख्या उड्या मारत होतो. माझ्यासोबत कैकाड्याचा विलास माने, महाराचा दिलीप राणबा कांबळे, मांगाचा सुग्रीव, कुंभाराचा विठ्ठल पोचापुरे, वडाराचा शेटीबा इत्यादी पोरं होती. मी हरणासारख्या उड्या मारायच्या हे सर्व गोविंदराव फाट्यांनी पाहिलं होतं. याच शाळेत 'विश्वनाथ हरीबा जाधव' नावाचे कुणब्याचे गृहस्थ मास्तर म्हणून नुकतेच नोकरीला लागलेले होते. गोविंदराव फाटेंनी त्यांना आदेश सोडला फलान्या ठिकाणी फलानी पोरं खेळत आहेत. त्यांच्या सोबत एक आदिवास्यांचं काळं पोरगं आहे. तिथे जा आणि त्या सर्वांना उचलून आणा. आपल्या शाळेत पोरांची कमतरता आहे. मागासवर्गीय मिळतील परंतु आदिवासीचं पोर मिळणार नाही आणि आदिवासी पोराशिवाय शाळेला अनुदान मिळणार नाही. त्या आदिवासी पोराला शाळेत प्रवेश दिलात तर तुमची नोकरी पक्की. झालं, विश्वनाथराव मास्तर आणखी काही साथीदारांसह आम्ही खेळत असलेल्या ठिकाणी आले. आम्हाला गोड गोड बोलून शाळेकडे नेण्याचा प्रयत्न केला. शाळा म्हटली की, मला धडकी भरली होती. कारण मागच्या वेळेस म्हेकर येथे त्या आलेल्या नवीन मास्तरानं मला जातीय द्वेष भावनेतून लई मारलं होतं. अंग लाल, निळं झालेलं होतं म्हणून मी तेथून धूम ठोकण्याच्या तयारीत होतो. परंतु विश्वनाथ मास्तरानं गोविंद नाईकवाडे नावाच्या मास्तराच्या मदतीनं मला धरलं. त्यांच्या दृष्टिकोनातून मी आदिवासी असल्यामुळे त्यांना महत्त्वाचा होतो. मी पळून गेलो असतो तर त्यांचं ध्येय साध्य झालं नसतं. तो गोविंद नाईकवाडे लई मोठा ताकतीचा माणूस होता. त्याचं शरीर फार पिळदार आणि मजबूत होतं. तो जातिवंत पैलवान होता. त्यानं मला एकाच हातानं पटकन धरलं आणि एकाच हातानं तेबी डाव्या हातानंच कंबरेपर्यंत उचललं आणि वाघानं तोंडात ससा धरल्यासारखं धरून घेऊन शाळेच्या वाटनं चालू लागलं. रागावलं अजिबात नाही. मला कमरेत उचलून धरल्यामुळे आणि आमचा येथून तेथून एकच अंगरखा असल्यामुळे

कमरेपासून खाली सगळंच उघडं झालं तरी नाईवाकडे मास्तरनं विश्वनाथ मास्तरला म्हटलं, 'याचं कमरेपासून खालचा भाग कसा दिसतंय बघा, पाषाणाच्या विहिरीतला काळा पाषाण' विश्वनाथ मास्तर हसला. तो मला म्हणाला, 'घाबरू नको बाळा! शाळेत गेल्यावर तुला मी घालायला चांगली पँट देतो.'

आम्हाला शाळेत आणलं गेलं. मी आपला भोकाड पसरून रडत होतो. गोविंदराव फाटे गुरूजी माझ्याजवळ आले. मला खालून वरपर्यंत पाहिलं. परत वरून खालीपर्यंत न्याहळलं. 'का रडतूस रं?' म्हणून दरडावलं. मायेनं डोक्यावरून हात फिरवलं आणि विश्वनाथ मास्तरला म्हटलं, 'याच्यासोबत जा, याला याच्या घरी सोडा. याचं घर, हा कोठे राहतोय ते बघून या आणि उद्या सकाळी येताना याच्या मायबापाला बोला. सर्व गोष्टी समजावून सांगून याला सोबत शाळेत घेऊन या.' विश्वनाथ मास्तरानं माझ्या हाताला धरून अगोदर मला एका कापडाच्या दुकानात नेलं. माझ्यासाठी नवी पँट, नवा सदरा खरेदी केलं. मला विचारलं, 'कुठाय तुझं घर?' तो माझ्या हाताला धरूनच चालत होता. आमच्या पालीवर आलो. विश्वनाथ मास्तरनं आमची पालं बघितली. बा व माँ होते. त्यांच्यासोबत मास्तरची चर्चा झाली. माँनं मागच्या मास्तराचा प्रताप सांगितला. तो मारल्यामुळे तवापासून यानं शाळा सोडली. तवा विश्वनाथ मास्तर म्हणाला, 'तसं इथं होणार नाही. एक तर आमची खासगी शाळा, त्यात नवीन, आम्हाला पोरांची गरज आहे. आम्ही सर्वांना गोडीनं व मायेनं लहान भावाप्रमाणं समजून शिकवू. मारहाण तर अजिबात नाही.' मला विश्वनाथ मास्तर आवडला होता. कारण त्यानं मला नवीन कपडे घेतले होते. माझ्यासोबत दोस्तापरमानं वागत होता. माँ व बा नं होकार दिला. दुसऱ्या दिवशी विश्वनाथ मास्तरांसगं शाळेत आलो. शाळा भरली होती. गोविंदराव फाटेंनी मला इच्यारलं, 'तुला लिहिता येतं काय?' मी म्हटलं, मला सगळं येतंय. गेल्यासाली तिसरीत होतो. मंग गोविंदराव फाटेंनी माझ्या हातात

पाटी दिली. मला लिहून दाखवायला सांगितलं. मी पूर्ण उजळणी, बाराखडी आणि तीसधाय तीनशे पर्यंत पाढे काढून दाखवलो. नंतर हातात पुस्तक आलं. पुस्तक मी खड खड वाचून दाखविलो. निलंगा इथं थेट चौथीत प्रवेश देण्यात आला. 'बरं झालं. चौथीला पाचवा पोरगा मिळाला. तुमची नोकरी पक्की झाली.' असे गोविंदराव फाटे मास्तर म्हणाले. आमची नियमित शाळा सुरू झाली. दोन तीन वर्षे आमचा अभ्यास म्हशींच्या पाठीवर झाल्यामुळे आम्ही वर्गात कुणालाही पुढे जाऊ देत नव्हतो. दिवाळी जवळ आली होती. सहामाही परीक्षा झाली. दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या. वर्गात पंचवीस-तीसच पोरं होती. परीक्षा मात्र साठ-पासष्ट पोरांची झाली होती. सुट्या संपल्या. पूर्ववत शाळा सुरू झाली होती. दिवाळीमध्ये फाटे मास्तर, विश्वनाथ मास्तर यांनी मला त्यांच्या घरी घेऊन गेले होते. विश्वनाथ मास्तराचं आणखी लगीन झालेलं नव्हतं. फाटे मास्तर स्वातंत्र्यसैनिक असल्यामुळे निलंगा गावात व परिसरात चांगला आदर व दबदबा होता. त्या काळात शिवाजीराव भाऊराव पाटील निलंगेकर हे मंत्री होते. फाटे मास्तरांनी त्यांना घरी बोलाविलं होतं. दिवाळीच्या फराळाला. त्यांच्यासोबत आणखी बरीच सरकारी लवाजमा व ऑफिसर होते. अन् पुढारीही होते. त्या सर्वांना फराळ देण्यास व पाणी देण्यास मीच फाटे मास्तरांच्या घरी होतो. पुढे पुढे होऊन लगबगीनं सर्वांना मी फराळ पाणी देत होतो. मंत्री शिवाजीराव पाटील माझ्याकडे बघत होते. त्यांनी न राहून फाटे मास्तरांना इच्यारलं, 'हा पोरगा कोणाचा? चांगला चुणचुणीत आणि चपळ दिसतोय.' फाटे मास्तरानी सांगितलं. 'साहेब हा आदिवासी पोरगा, फिरत होता उनाडक्या करत. आणलं धरून अन् घातलो शाळेत. आपल्याला बी आदिवासी पोराची गरज होती. लई चुनूकदार पोरगा आहे. अन् हुशार बी. चौथीला शिकतोय.' शिवाजीराव पाटील मुंडी हलवित म्हणाले, 'बरा दिसतोय' मला जवळ बोलावलं. बाचं नाव इच्यारलं. माझं नाव इच्यारलं. मी म्हटलं, 'माझं नाव राम बा चं नाव गंगाराम.' परत पाटील आणि इतर

मंडळी हसले. पाटील म्हणाले, 'बरं हाय दोनदा राम हाय. चांगलं शिक.' म्हणून शिवाजीराव पाटलांनी माझ्या पाठीवरून हात फिरवला. त्यांचा हात माझ्या पाठीवरून फिरत असताना त्यांच्या हृदयात माझ्याविषयी माया दिसत होती. मी म्हटलं, 'शिकतो की, माझी बी लई शिकायची इच्छा हाय. माझ्या माँ ची इच्छा पण मला शिकवायची हाय, पर माझा बा आम्हाला एका जागी ठेवतच नाही.' असं मी न भिता बोललो. 'आता इथ राह्याचं' असे पाटील म्हणाले. अन् खिशातून दहा रूपयांची नोट काढून मला दिली. मी नगं म्हणत होतो. पर जबरदस्तीनं पाटलांनी माझ्या खिशात कोंबली. सगळे उटले आणि फाटे मास्तरांचा निरोप घेऊन गेले. तसं फाटे मास्तरांचं घर आणि शिवाजीराव पाटलांचं घर जवळपास एकाच गल्लीत असल्यासारखे होते.

सहामाही परीक्षेचा निकाल लागला होता. वर्गात माझा पहिला नंबर होता. दोन वह्या, एक पेन आणि एक बिस्कीट पुडा मला बक्षीस मिळालं होतं. दिवाळीच्या नंतर शाळा सुरू झाली होती. पुढचा अभ्यासक्रम सुरू झालेला होता. सकाळी प्रार्थना होत होती. संध्याकाळी परवंच्या. हा नित्यनियम चालू होता. फाटे मास्तर मला कोणतं ना कोणतं काम देऊन शिवाजीराव पाटलांच्या घरी पाठवायचे कारण पाटील मंत्री होते. शिवाय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांच्या सहीबिगर शाळेचे कोणतेही काम होत नव्हते. फाटे मास्तर स्वातंत्र्य सैनिक पण शाळेचे हेडमास्तर. मंत्र्यांच्या पुढं नेहमी जाणं यांचा कंटाळा आणि म्हणून कोणत्याही सह्या आणायला मंत्री महोदयांच्या घरी मलाच पाठवायचे. कारण मंत्री महोदयांची आणि माझी बरीच ओळख झाली होती. ते माझ्यावर मायाही करीत होते आणि मी गेलो की, कागद, रजिस्टरवर सही घेऊनच यायचं. यामुळे शिवाजीराव पाटील यांच्या घरीही माझी ओळख वाढली होती. घरची सर्वच माणसे मायाळू होती. साहेबांची आई मी घरी गेलो की, पाणी पे, जेवण कर असा आग्रह करायच्या. त्यांना मी पण 'माय' म्हणून हाक मारायचो. साहेबांची

मंडळीही तशीच मायाळू. त्यांना मी आई म्हणायचो. आईचा चेहरा नेहमी हसरा दिसायचा. आई नेहमी प्रफुल्लित असायची. डॉ. शिवाजीराव पाटलांच्या घरची खरी लक्ष्मी शोभायची. चेहऱ्यावर नेहमी समाधान. अशा पद्धतीनं आमचं शिक्षण सुरू होतं. मी आदिवासी असल्यामुळं जडीबुटी, औषधांची बाला जाणीव होती. मी त्यांचा मुलगा म्हणून डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर हे मला डॉक्टर म्हणायचे. दिवसामागून दिवस गेले. अन् आमची चौथीची वार्षिक परीक्षा जवळ आली होती. आता आमच्या वार्षिक परीक्षा सुरू झालेल्या होत्या, चौथीची बोर्ड परीक्षा असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या मुलींच्या शाळेत आमचं परीक्षा केंद्र आलं होतं. परीक्षा केंद्र दुसऱ्या शाळेत, आम्हाला थोडं अवघडल्यासारखं वाटायचं. परीक्षेला नवीनच मास्तर, अधून मधून विश्वनाथ मास्तर वर्गावर चक्कर मारायचे. वर्गावर एक मास्तरीणबाई गार्डिंगला आलेल्या होत्या. तशा त्या बऱ्या होत्या. परंतु मी लिहिलेलं इतरांना सांगत होत्या. यामुळे मला राग येत होता. अशा पद्धतीने आमचे सारे पेपर संपले. चौथीची परीक्षा संपली.

(उघडा दरवाजा)

❖❖❖

# ६.

# शांती

**-अभय बंग**

***डॉ. अभय ठाकुरदास बंग (जन्म १९५०)*** *गडचिरोलीसारख्या आदिवासी भागात स्वयंप्रेरणेने आरोग्यसेवा देत, आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन केले आहे. वैद्यकीय व्यवसायातील एम. बी. बी. एस. पदवीसह, 'मास्टर्स इन पब्लिक हेल्थ' ही पदव्युत्तर पदवी अमेरिकेच्या जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठातून सुवर्णपदकासह प्राप्त. 'सर्च' या वैद्यकीय संशोधन संस्थेचे संस्थापक. महात्मा गांधी, लोक आणि विज्ञान या त्यांच्या कार्यांच्या प्रेरणा आहेत. गडचिरोली जिल्हा दारूमुक्ती आंदोलन सामान्य जनतेला सोबत घेऊन त्यांनी यशस्वी केले. स्त्रियांचे आजार व बालमृत्यू नियंत्रणावरील त्यांनी केलेल्या संशोधनाची दखल भारतासह जगाने घेतली आहे. आदिवासी समाजाच्या कुपोषणावर व नवजात अर्भकाच्या मृत्यूवर 'कोवळी पानगळ' हा शोधनिबंध खूप गाजला. या शोधनिबंधामुळे जागतिक आरोग्य संघटनेला (डब्लू. एच. ओ.) आरोग्यविषयक धोरण बदलावे लागले. डॉ. अभय बंग यांचे अनेक संशोधनपर लेख जगप्रसिध्द 'द लॅन्सेट' या वैद्यकीय मासिकातून*

*प्रसिद्ध झाले आहेत. इ. स. २०१८ साली 'पद्मश्री' पुरस्कार, २००३ मध्ये 'महाराष्ट्रभूषण पुरस्कार,' त्यांना प्राप्त झाले आहेत. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने त्यांना 'डी.लिट्.' पदवी प्रदान केली आहे.*

*'माझा साक्षात्कारी हृदयरोग' हे लेखकाचे स्वतःच्या हृदयरोगावरील स्वकथन आहे. हृदयरोगाच्या घटनेतून स्वतःच्या जीवनाचे अवलोकन करीत हृदयरोगाची कारणे व त्याच्या निराकरणापर्यंतचा प्रवास त्यांनी प्रामाणिकपणे सांगितला आहे.*

---

## १.

माझा हा सर्व मानसिक, आध्यात्मिक प्रवास का सांगतो आहे? तो सांगितल्याशिवाय माझ्या हृदयरोगाचं कारण व त्यातून बाहेर कसा आलो याची कहाणी पूर्ण होणार नाही, असं मला वाटतं. जीवनाचा अर्थ व आनंद पुन्हा प्राप्त केल्याखेरीज माझं हृदय दुरुस्त होऊ शकलं नसतं आणि जरी झालं असतं तरी पॅच मारलेलं हृदय व असंतुष्ट मन यांसोबत जगून माझं जीवन निरोगी कसं झालं असतं? मला केवळ शारीरिक हृदय निरोगी असणं पुरेसं नव्हतं. माझं मानसिक हृदय व पूर्ण जीवनच निरोगी, एकसंध होणं आवश्यक होतं. माझा योग व ध्यानाचा प्रवास तसंच सत्य आणि ईश्वराच्या स्वरूपाचा कळलेला अर्थ या काहीशा असंबद्ध, अस्पष्ट, व्हेग वाटू शकणाऱ्या गोष्टींचा माझ्या हृदयाशी व प्रसन्नतेशी अविभाज्य संबंध आहे. या प्रवासामुळे माझं भंगलेलं व्यक्तित्व सांधलं गेलं, जखमा भरल्या. आपण विश्वापासून तुटलो, स्वतःपासून फाटलो, आपले तुकडे तुकडे झालेत या विदारक दुःखामधून अध्यात्मामुळे 'सर्वत्र समग्र ईश्वर' ही दृष्टी व किंचितसा अनुभव येऊन मी पुन्हा जोडला गेलो. ताण, व्याकुळता, वेदना गेली. आनंद परत आला. सोबतच माझं हृदयही दुरुस्त झालं.

माझ्या वाढवून मिळालेल्या आयुष्याची आता तीन वर्षे पूर्ण होत

आहेत. सध्या मी कसा आहे?

- शारीरिकदृष्ट्या निरोगी आहे. वजन ५८ किलो, रक्तातील कोलेस्टिरॉल १४९ मि. ग्रॅ आहे आणि त्यातही एच.डी.एल. कोलेस्टिरॉल ४७ मि.ग्रॅ. आहे. कोलेस्टिरॉल/एच.डी.एल. रेश्यो जवळपास ३ आहे, जो अगदी सुरक्षित मानला जातो. रक्तातली साखर नियंत्रित आहे. कोणताही त्रास न होता चालू, पळू व सायकल चालवू शकतो. डॉ. लेलेंनी मुंबईला बोलवून अगत्याने माझी स्ट्रेस थॅलियम टेस्ट ही हृदयाची तपासणी केली. ती नॉर्मल आली. माझ्या हृदयाच्या रक्तवाहिन्या मोकळ्या आहेत.

- पूर्वीची माझी सर्व कामं व जबाबदाऱ्या पूर्ण करतोच आहे पण दबाव, ताण फार कमी झाला. जबरदस्तीने काही घडविण्याची, अजून कुठेतरी पोचण्याची अधीरता कमी झाली.

- मनाने खूप शांती अनुभवतो. अस्वस्थता कमी झाली आहे. फक्त या क्षणात जगण्याचा प्रयत्न सुरू आहे.

- योग व अध्यात्माच्या मार्गावरचा प्रयत्न व प्रवास हळूहळू सुरू आहे. मी अजूनही माझ्या मनाचं शेत नांगरतो आहे. पाऊस अजून पडलेला नाही. पण हे नांगरणंच किती सुंदर अनुभव आहे! अजून मी कुठेच पोचलेलो नाही. कुठे पोचीन ते माहीत नाही की या मार्गावर पोचण्याचं वेगळं कोणतं ठिकाणच नाही?

- जीवनात आशा वाटते. जीवन किती आनंदमय व परिपूर्ण आहे! आणि अजून किती तरी जगायचं आहे, शोधायचं आहे!

१३ मे ९५ रोजी हॉस्पिटल बेडवरून केलेल्या १३ निश्चयांपैकी १२ निश्चय पूर्ण झाले किंवा त्यासाठी चांगलेच प्रयत्न केले. गडचिरोलीला कोणी संगीत शिक्षक न मिळाल्याने संगीत शिकण्याचं उद्दिष्ट तेवढं पूर्ण करता आलं नाही. अजून काही गोष्टी करायच्या आहेत. एकदा हिमालयात जायची तीव्र इच्छा आहे. संगीत व संस्कृत शिकायची इच्छा आहे. शरीरश्रमासाठी स्वतःच्या आवश्यकतेपुरता भाजीपाला पिकविण्याइतकं

तरी शेतीकाम करावं, अशी इच्छा आहे. अशा बऱ्याच गोष्टी करायच्या आहेत. संशोधन व आरोग्यसेवेच्या कामाच्या नव्या कल्पना व प्रकल्प तर आजारानंतर गडचिरोलीला परत पोचण्यापूर्वीच मनात साकार व्हायला लागल्या पण आता त्यात अधीरता, ताण नाही. काळाची लय समजली म्हणजे आपली पाऊलं बेताल होत नाहीत.

**माझा रोजचा दिनक्रम कसा असतो?**

सकाळी ५ च्या दरम्यान उठतो. सकाळी अर्धा तास आध्यात्मिक वाचनानंतर ४० मिनिटं फिरायला जातो. रोजच्या जीवनातील परमोच्च बिंदूंपैकी एक हे जंगलात फिरणं असतं. परतल्यावर यौगिक क्रिया, आंघोळ, योगासन, शवासन करून मग अर्धा तास प्राणायाम व ध्यान करतो. शरीर व मन एक होऊन अजून कुठल्या तरी तत्त्वाशी सूर साधण्याचा प्रयत्न करीत असतात. कधी सूर लागतो, कधी हुलकावण्या देतो. पण विलक्षण आनंदाचा अनुभव येतो. साधारणपणे ९.०० च्या दरम्यान माझ्या कामाला सुरुवात करतो. दुपारी जेवणानंतर अर्धा तास शवासन व वामकुक्षी घेऊन पुन्हा ६ पर्यंत काम. नंतर शोधग्राममधील सामूहिक प्रार्थना. रात्री जेवल्यानंतर मुलांसोबत थोडा वेळ घालवून नंतर रात्री एक दीड तास वाचन करतो. दहाच्या दरम्यान थोडा वेळ शवासन व ध्यान करून मग झोपतो.

**२**

माझा सर्व प्रवास सांगून झाला पण ज्या प्रश्नामुळे हा प्रवास सुरू झाला त्याचं काय झालं? १८ एप्रिल ९५ रोजी छातीत दुखल्यानंतर "हृदय रोगामुळे आपण आता मरणार का?" ही जी भीती मनात निर्माण झाली होती तिचं काय झालं? माझा मृत्यूच्या भीतीचा प्रश्न सुटला का?

मृत्यूच्या अनपेक्षित संभावनेने मी हादरलो होतो पण भीती खरंच मृत्यूची होती का? मृत्यूची भीती म्हणजे मृत्यूच्या क्षणाची किंवा घटनेची

धास्ती नव्हती. तिथपर्यंत मी जाऊन आलो होतो. अँजिओप्लास्टी टेबलावर मृत्यूच्या अगदी जवळ जाऊन बघण्याच्या क्षणी मृत्यू केवळ अणुविसर्जन आहे हे लक्षात आलं होतं. वेदना नव्हत्या, कष्ट नव्हते. मग भीती कसली होती?

भीती मृत्यूची नव्हती, भीती मृत्यूमुळे जीवन गमावण्याची होती. जीवनावर माझं प्रेम होतं. अजून जगण्याची इच्छा होती, अजून खूप जगायचं राहिलं होतं. ते सर्व हातातून निसटून जाण्याचं दुःख होतं. त्यामुळे भीती व असुरक्षितता वाटली होती. त्याची लाज कशाला?

आता मनात ती भीती, ती असुरक्षितता जाणवत नाही. 'जाणवत नाही' असं मुद्दाम म्हणतो. ती कुठे लपलेली नसेलच असं काही सांगता येत नाही. आता शांत वाटतं पण पुन्हा मृत्यूचा क्षण येईल तेव्हा ही शांतता टिकेल? भल्या भल्यांची त्रेधा उडते. माझी काय अवस्था होईल?

'मंगलप्रभात' मधे अभय या गुणाबाबत लिहिताना गांधीजी लिहितात, "सर्व भीती एका देहामुळे आहे. देहावरील ममता झडली तर अभय सहजी प्राप्त होईल". अपरिग्रहाबाबत लिहिताना ते लिहितात, "शरीरसुद्धा परिग्रहच आहे. भोग-लालसेपायी आपण शरीराचे आवरण उभे केले आहे व ते टिकवून धरीत आहोत. भोगेच्छा फार क्षीण झाली की मग शरीराची आवश्यकता राहात नाही ......आत्मा सर्वव्यापी आहे. मग त्याने शरीररूपी पिंजऱ्यात स्वतःला का कोंडून घ्यावे? हा पिंजरा टिकवून धरण्यासाठी नाही नाही त्या गोष्टी का कराव्यात?"

एवढी उन्नत अवस्था माझी नक्कीच नाही. गांधीजींची होती म्हणून ते छातीत गोळ्या लागल्यावर शांतपणे 'हे राम' म्हणाले. मी कसा वागेन? The day which we fear as our last is but the birthday of our eternity. हा भाव तेव्हा कायम राहील का?

ही एक जिज्ञासाच आहे. 'लान्सेट' या वैद्यकीय जर्नलमधे प्रसिद्ध वैज्ञानिकांच्या मुलाखती येतात. एक प्रश्न असतो. "तुम्हाला कसं मरायचं

आहे?" उत्तरात बहुतेक जण म्हणतात, झोपेत, किंवा हार्टअटॅकने अचानक मरायचं आहे पण एकाने उत्तर दिलं - "पूर्णपणे जागृत अवस्थेत सावधपणे एक-एक क्षण बघत मरायचं आहे. मला तो महान अनुभव मुकायचा नाही!"

आमचा मित्र अनिल अवचट पत्रात म्हणाला - "मृत्यूचं दर्शन अत्यंत दाहक व पवित्र करणारं असतं. सगळं अशुद्ध त्यात जळून खाक होतं."

एकनाथ महाराजांची एक कथा आहे -

एक माणूस एकनाथ महाराजांना जाऊन म्हणाला, महाराज, "आम्ही सामान्य माणसं. आमच्या मनात सदैव सांसारिक किंवा पापी विचार येतात. तुम्ही संत यापासून कसे मुक्त राहता?" एकनाथ म्हणाले, "आम्हा संतांचं सोड पण तुझा मृत्यू ७ दिवसांनी नक्की आहे, हे मला दिसतं आहे!" एकनाथ महाराजांनी सांगितलेलं खोटं कसं असणार? त्या माणसाने परत जाऊन सर्व निरवानिरव केली. मित्रांचा निरोप घेतला. शत्रूंची क्षमा मागितली. दानधर्म करून टाकला. सातव्या दिवशी महाराज त्याला भेटायला गेले, तेव्हा हा बिछान्यात पडून मृत्यूची वाट बघत होता. महाराजांना पाहून म्हणाला, "महाराज, मी आज चाललो." महाराजांनी विचारलं, "या सात दिवसांत कितीदा पापाचे विचार मनात आले?" "कुठले पापाचे विचार? मला तर सात दिवसांनी मृत्यू आहे हेच दिसत होतं!" तो माणूस उद्गारला. महाराज म्हणाले, "आम्हा संतांनाही मृत्यू सदैव डोळ्यांसमोर दिसत असतो. म्हणून आम्ही पापापासून दूर राहू शकतो."

सर्वांना मी एकच शुभेच्छा देऊ शकतो. प्रत्येकाला एकदा तरी मृत्यूचं दर्शन अवश्य व्हावे!

३

"आता पुढे काय करावं?" अँजिओप्लास्टी होऊन लखनौहून परतल्यावर २० मे ९५ रोजी नागपुरात असताना मी व राणी विचार करीत होतो. भला मोठा हार्टअटॅक यापुढे केव्हाही येण्यासाठी आम्ही मनाची तयारी ठेवणं आवश्यक होतं. गडचिरोलीच्या जंगलात शोधग्रामला राहताना तसा अटॅक आला तर वैद्यकीय मदतीच्या अभावी मी वाचण्याची शक्यता कमीच होती. यापुढे गडचिरोलीतच काम करावं? की जिथे आधुनिक वैद्यकीय सोयी ताबडतोब मिळू शकतील अशा मोठ्या शहरात राहायला जावं? तिथे राहून माझा जीव कदाचित वाचेल पण त्यापूर्वी आजपर्यंत स्वीकारलेलं जीवन व काम सोडावं लागेल. काय करावं?

मरावसं तर वाटत नव्हतं पण जीवनाचा उद्देश गमावून आयुष्य वाढविण्यात काही अर्थ आहे का? मरणाच्या भीतीने आजच का मरण स्वीकारायचं? आमचं पुढील आयुष्य तिथे गडचिरोली जिल्ह्यातच जाणार, असं आम्ही ठरवलं. यात त्याग बिग कोणी बघू नये. सरळ सोपा विचार होता. जीवनाचा हेतूच गमावला तर जीवन असह्य होईल. "ईहलोकी कर्मे करीत करीतच शंभर वर्षे जगण्याची इच्छा धरावी. तुला देहवंताला हाच मार्ग आहे. याहून वेगळा मार्ग नाही" ईशावास्योपनिषद् स्पष्टच सांगत होतं. मला दुसरा मार्ग नव्हता. आपलं काम करता करता निदान शंभर वर्षे जगण्याची इच्छा तरी धरू शकत होतो!

माझ्या आजाराच्या उपचारासाठी मला व राणीला एप्रिल ९५ मध्ये अचानक शोधग्राम सोडून बाहेर जावं लागलं. ४५ दिवस आम्ही बाहेर होतो. मी जिवंत परतेन याची शाश्वती नव्हती. त्या काळात 'सर्च' च्या कार्यकर्त्यांनी विलक्षण प्रेरणा व एकजूट दाखविली. कुणीही बुडत्या जहाजातून उड्या मारल्या नाहीत. सर्व कार्यक्रम पूर्ववत सुरळीत सुरू राहिले. "मी स्वतः केल्याखेरीज हे काम व्यवस्थित होऊ शकणार नाही" असा स्वतःच्या आवश्यकतेविषयी किती विनाकारण गैरसमज होता माझा! राणीचा उत्साह

व कामाचा उरक अफाट आहे. माझ्या आजारानंतर परतल्यावर आम्ही तीन वर्षांचा नवा प्रकल्प आखला, तो वेगात सुरू झाला. मी पुन्हा कामाला लागलो.

४

काम अजूनही तेच करतो, जे पूर्वी करीत होतो. 'सर्च'ची रुग्णसेवा, ग्रामीण आरोग्यसेवा व संशोधन, व्यसनमुक्ती, युवक-युवती प्रशिक्षण ही सर्व कामं उत्तम सुरू आहेत. झेन पंथातली एक पुरातन म्हण आहे -

"साक्षात्कारापूर्वी मी लाकडं फोडत होतो, पाणी भरत होतो.
साक्षात्कारानंतरही मी लाकडं फोडत होतो, पाणी भरत होतो."

मी तर साक्षात्कारापासून खूप दूर आहे. पूर्वीचंच काम करतो पण आतली समज, भाव थोडा बदलला. फापट पसाऱ्यातला गुंता कमी झाला. कधी राग येतो. कधी अपेक्षाभंगही होतो. बरेचदा नकळत मन स्वप्नरंजन करायला लागतं किंवा कामाची व परिणामांची आसक्ती होते पण मनात आकांक्षा निर्माण झाल्या रे झाल्या, की असमाधान व ताण सुरू होतात हे लक्षात येतं. मग मी स्वतःला सावरतो. भार फेकून देतो. त्यामुळे अधिक प्रसन्नता आहे.

खरं म्हणजे अट्टाहासाने केलेली धडपड किती विनाकारण आहे हेही लक्षात यायला लागलं आहे, जीवनाच्या प्रवाहात सहजपणे तरंगत राहिल्यास आपण आपोआप पोचतो. अट्टाहासाने पोहण्याचा व पोचण्याचा प्रयत्न केला की नाकातोंडात पाणी जाते पण या प्रवाहावर त्याच्या दिशेने व गतीने बोर्ड लागलेले नाहीत. 'काही न करता' निवळ पाण्यावर सहजपणे तरंगत राहिल्यास तो जीवनप्रवाह समजतो, जाणवतो. हे साधं, प्राथमिक सत्य मला उमजायला लागलं.

मृत्यूची काळजी, जीवनाचा उद्देश व जीवन कसं घालवावं या विषयाच्या माझ्या विचारांचा गोंधळ संपला. बुद्धीला उत्तर कळलं पण

यामुळे उत्तर हाती गवसलं नाही. नकाशावर दिल्ली कुठे हे समजणं व प्रत्यक्ष दिल्लीला पोचणं यातला जो फरक आहे तोच मला माझा मार्ग समजणं व मी त्यावर चालून पोहोचू शकण्यात आहे. खूप समजलं की, हे विश्व, यामागचं वैश्विक सत्य व मी हे एकच आहोत, पण म्हणून का स्वतःला वेगळं बघण्याची वृत्ती गेली? बुद्धीच्या पातळीवर जे समजलं ते जाणीवेच्या, वृत्तीच्या व आचरणाच्या पातळीवर येणं हा खूपच लांबचा पल्ला आहे. हे शरीर व मन किती मातीचं बनलं आहे याचा वारंवार प्रत्यय येतो. बुद्धी हजार मैल पुढे धावते, शरीर व मन खूप हळूहळू पुढे सरकतात. शरीराच्या व मनाच्या सवयी बदलत नाहीत. जुन्याच वळणावर वारंवार जातात पण मन निराश होत नाही. या धडपडीत, प्रवासात भरपूर आनंदाचा अनुभव येतो. या जन्मात कदाचित पूर्ण अंतर कापूही शकणार नाही. शरीर तेवढा काळ तग धरेलच याची काय खात्री? पण प्रत्येक दिवस व प्रत्येक क्षणच जर गंतव्य झालं तर अजून वेगळं कुठे पोचण्याची गरज उरणार नाही. कासवाच्या गतीने मी चालतो आहे. मी ससा नाही. ती गती मला प्राप्त नाही. प्राप्त होणारही नाही. त्याची खंतही नाही. कासव चालतं आहे, अजून चालतंच आहे.

माझा प्रवास अजून सुरूच आहे. अनेकदा भ्रमात सापडतो. कधी परिस्थितीमुळे, अनेकदा स्वरचित पण काही दिवसांनी अचानक थोडा प्रकाश दिसतो व त्या भ्रमचक्रातून सुटका होते. घाण्यासारखा जागच्या जागीच चकरा मारतो आहे, की स्पायरल जिन्यासारखा प्रत्येक चक्राकार प्रवासानंतर पूर्वीपेक्षा थोडा वर चढतोय, कुणी सांगावं? आणि पुन्हा पूर्वीच्याच जागी पोचलो तरी या वेळी नवाच अर्थ गवसतो.

अजून मी सर्वत्र ईश्वराचं दर्शन करू शकत नाही. सर्व लोकांशी अजूनही पूर्ण प्रेमभावनेने एकरूप होऊ शकत नाही. मला माहीत आहे की प्रेम इतरांशी जोडतं, बुद्धी त्यात तोकडी पडते. माझं 'मी' पण संपलेलं नाही. संपतच नाही. वारंवार मधे येतं व अडथळा बनतं पण मी सुधारतो

आहे. रोज स्वतःला बदलवण्याचा, घडवण्याचा आनंद घेतो आहे. जेसी जॅक्सन या नीग्रो प्रीस्टने १९८४ मध्ये म्हटलेलं एक वाक्य मला कायम आठवतं.

"मित्रांनो, माझ्या दोषांसाठी मला क्षमा करा. ईश्वराने माझ्यावर काम करणं अजून संपवलेलं नाही!"

**(माझा साक्षात्कारी हृदयरोग)**

❖❖❖

# ७.

## गाई घरा आल्या

**-इंद्रजित भालेराव**

**इंद्रजित नारायणराव भालेराव (जन्म १९६२)** *महाराष्ट्रातील प्रसिद्ध ग्रामीण कवी व लेखक. ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी येथे मराठीचे अध्यापक. भालेरावांच्या साहित्याला काळ्या मातीचा, शेतकरी कष्टाचा आणि लोकसंस्कृतीचा लळा आहे. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांसह कर्नाटक, गोवा आणि राष्ट्रीय अभ्यासक्रमांत त्यांच्या साहित्याचा समावेश आहे. साहित्य अकादमीने त्यांच्या अनेक कवितांचे भारतीय भाषांमध्ये अनुवाद केले आहेत.*

*'पीकपाणी,' 'आम्ही काबाडाचे धनी,' 'दूर राहिला गाव,' 'पेरा' यासह एकूण बारा कवितासंग्रहांचे लेखन त्यांनी केले आहे, 'गाई घरा आल्या,' 'घरीदारी,' 'तिफणसाज' यासारखे ललित लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत. 'समग्र बी. रघुनाथ,' 'बहिणाबाई चौधरी,' 'संत जनाबाई,' 'ताराबाई शिंदे,' 'गाऊ जिजाऊस आम्ही,' 'मऱ्हाठवाडी' अशा विविध ग्रंथांचे त्यांनी*

संपादन केले आहे.

कवी इंद्रजित भालेराव यांना महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या संस्थांसह इतर अनेक मान्यवर संस्थांचे सन्मान प्राप्त झाले आहेत.

प्रस्तुत ललित लेखातून बालपणी गुरे राखण्याचे व कृषिसंस्कृतीतील विविध अनुभवांचे दर्शन घडविले आहे. त्यासोबतच या ललित लेखात कविमनाचेही भावस्पर्शी दर्शन घडते.

---

बाई नेनंता गुराखी ढोरं वळीतो गं कसे
रुंद पाठीच्या म्हशिवं जसा पालखित बसे
बाई नेनंता गुराखी कसा दिसना कोठंसी
झडपला पावसानं उभा गाईच्या पोटंशी

भल्या पहाटेची साखरझोप जात्याच्या घरघरीमुळे अधिकच गोड व्हायची. अर्ध्या झोपेत आणि अर्ध्या जागेत भोवती कसले-कसले आवाज यायचे. बाबांच्या पाण्याच्या घागरी हौदात पडताना धोऽऽधोऽऽ डब्, धोऽऽ धोऽऽ डब् असा आवाज, आडावरच्या पोहऱ्यांचा आवाज, मंदिरातल्या आरतीत वाजणाऱ्या झांज-नगाऱ्याचा आवाज, नंतर बाबांनी पेटवलेल्या वतलात जळणाऱ्या कचऱ्यातल्या गवताच्या बिया फुटताना होणारा तडतड असा आवाज. अशा अनेक आवाजाबरोबरच मधून-मधून आईने जात्यावर म्हणलेल्या ओव्यांचाही आवाज असायचा. देवाधर्माच्या ओव्या म्हणत-म्हणत मध्येच आई आमचे नाव ओव्यात घालून गुण गायची. शेवटी ओव्यातूनच आम्ही उठावं म्हणून भावाच्या नात्याआडून आमच्यासाठी ओव्या म्हणायची....

गाईच्या गोतराचा
आंगनी आला पूर

रोजेंदर रे बंदवा
गवळ्या भिजलं धोतर
पाटच्या पाऱ्यात
वासरू हांबरलं
राजेंदर रे बंदवा
उठ गवळ्या उजाडलं

तरीही आम्ही काही उठत नसू. मग आमच्या अंगावरची गोधडी खेचून बाबा किंवा मोठा भाऊ आम्हाला उठवत आणि कामाला लावत.

मोठ्या पेरणीच्या दिसात सकाळीच उठून गोमतर जमा करावं लागायचं. दिवसभर पेरण्यासाठी लागणारं बी सकाळीच गोमतरात घोळून ठेवावं लागायचं. त्यासाठी खूप गोमतर लागायचं. म्हणून आम्ही डोळे चोळत गावातले सगळे गोठे धुंडाळायचो.

गुरं राखण्याची पहिली आठवण आहे ती बहात्तरच्या दुष्काळातली. त्या वर्षी कामावर गुराखी ठेवण्याची ऐपत नव्हती आणि घरात गुरं राखण्याच्या वयाचं माझ्याशिवाय दुसरं कुणी नव्हतं. मी असेल आठ-नऊ वर्षाचा. चौथीच्या वर्गात होतो. शाळा दुष्काळामुळे बंदच होत्या.

खरं तर गुरे राखण्याची तेव्हा गरजच नव्हती. शिवारभर कुठंही फारशी पिकंच नव्हती. कुठंतरी नदी-नाल्याच्या काठाच्या विहिरी असतील तर तिथं थोडाफार ऊस असायचा; परंतु त्याची कुपाटी इतकी गच्च असायची की जनावराला आत थोडंही तोंड खुपसता येत नसे. फक्त आपल्या गाई कुणी कापून खाऊ नये, त्यांना खाटकानं पळवून नेऊ नये म्हणून उगं मागं-मागं फिरावं लागायचं. जिकडं-तिकडं नुस्त ऊनच-ऊन असायचं. वाकून आभाळ टेकलं तिथं तर सोडाच; पण जवळ कासराभर अंतरावरही झळा दिसायच्या. खूप मोठ्या जाळाजवळ उभं राहिल्यासारखं वाटायचं. आम्ही कुठंतरी सावली शोधण्याचा प्रयत्न करायचो, तर कुठं सावलीच नसायची. लोकांनी झाडांचा पालाही गाईगुरांना चारला होता

आणि लिंबासगट सगळा पाला गुरांनी खाल्ला होता. त्यामुळं झाडाखाली सावलीच नसायची. नुस्तं सगळीकडं ऊन ऊन आणि ऊनच. इखासारखं.

दुपारी दूरवरच्या थुना नदीच्या धरमवाडी डोहावर नेऊन गुरं पाणी पाजून आणावी लागत. संध्याकाळी गावातल्या आडावर सगळ्या गावाची गुरं पाणी पिण्यासाठी जमत तेव्हा नुस्ता गोंधळ असायचा. सगळा आड पाणी शेंदणाऱ्या माणसांनी आणि पाणी पाजायच्या दुरड्या-बादल्यांनी भरून जायचा. गर्दीमुळं एकेक पोहरा शेंदायला घंटा लागायचा आणि आडाभोवती जनावरांची इतकी गर्दी असायची की, जणू पोळ्यासाठी सगळ्या गावाची जनावरं आडाभोवती जमलीत. एकाचं जनावर धसमुसळेपणानं दुसऱ्याच्या दुरडीत पाणी पी, टकरी लाग, भांडणं लाग, असा नुस्ता गोंधळ.

एकदाचं पाणी पाजून उघड्या रानातल्या दावणीला गुरं बांधलो की आम्ही मोकळे. दिवसभर उन्हातान्हात फिरून खूप भूक लागायची. घरी तर भाकरी भाजलेली नसे. मग कुरवड्या खारवड्या, नाहीतर सकाळच्या कदूच्या भाजीत मुरलेली भाकर मोठ्या चवीनं मेवा खाल्ल्यासारखी खात असू. नंतर रात्री जेवण केलं की, गुडूप झोप लागून जात असे.

रात्री केव्हा तरी खूप वेदना होऊन जाग येत असे. प्रचंड दाटून लघवी किंवा परसाकडेला आल्यासारखं वाटायचं. नुस्ती अंगाची आग होत असे. माझ्या कण्हण्यानं वडील जागे होत आणि मला झळ लागल्याचं त्यांच्या लक्षात येत असे. मग ते उठत आणि माझ्या तळपायला ओली राख चोळीत. खूप पाणी प्यायला सांगत. तरीही माझं कण्हणं सुरूच. आग थांबतच नसे. रात्रीच्या गच्च अंधाराची भीतीही वाटे. झोपेमुळं डोळाही उचलत नसे. बाजेच्या ठाव्याला धरून मी तसाच बसलेला असे. वडिलही बाजेवर उठून बसत. त्यांच्याशी बोलत बोलतच मी लघवीला जाऊन येत असे. मग भीती वाटत नसे. शेवटी वडील म्हणत की, 'बस बाजेजवळच; काय थेंब-थेंब तर लघवी येत असेल!' मग मी तिथेच बसे. बसल्या-

बसल्या डुलक्या येत. वडिलांनाही झोप येऊ लागलेली असे. शेवटी वडील मला पूर्ण कपडे काढायला सांगत आणि सर्वांग ओल्या कपड्यानं पुसून घेत. बेंबीत पाणी टाकत, माथ्यावर पाणी थापत. हळूहळू पाठीवर थोपटत. दरम्यान आईही जागी झालेली असे. दिवसभर उन्हात बोडकंच हिंडतं पायात नीट काही घालीत नाही, असं काहीतरी ती गुणगुणत असे. वडिलांच्या थोपटण्यानं मला केव्हा झोप लागली ते समजत नसे. वडील मला बाजूला सारून अंथरूण नीट करत आणि पुन्हा मला अंथरुणावर झोपवत.

याच दुष्काळाच्या वर्षी उंटावरून शेळ्या राखणारे राजस्थानी धनगर आणि डाफण्या गाई घेऊन दूर देशाचे लमाण आले होते. त्यांचे उंट, त्यांच्या बाया आणि त्यांचे कपडेही आमच्यासाठी नवलाईची गोष्ट होती. कारण उंच असा उंट हा प्राणी, पुरुषांनी घातलेले लेंग्यांसारखे कलाकुसरीचे कपडे आणि काळेशार कपडे घातलेल्या गोऱ्यापान रूपवान बाया आम्ही पहिल्यांदाच पाहात होतो. खरं तर त्यांचा लोभ वाटण्यापेक्षा आम्हाला रागच अधिक येत होता. कारण आधीच दुष्काळ आणि त्यात हा तेरावा महिना. त्यांच्या उंटांनी झाडपाला, गाईंनी गवत पाचोळा आणि मेंढ्यांनी झाडझुडुप असा सगळा शिवार फुकून खाऊन टाकला. आधी शेतात मेंढ्या बसवायला ब्राह्मणासारखा असली गावरान तुपासह शिधा घेणारे हे राजस्थानी लमाण आणि धनगर या वर्षी कुठंही मेंढ्या गाई बसवत होते. कारण त्यांना देण्यासाठी कुणाजवळच काही नव्हतं. गाय सोडून जाताना या लमाणांची एक थकलेली म्हातारी डाफनी गाय एका झाडाखाली बसली ती पुन्हा उठलीच नाही. तिला तसंच टाकून हे लोक निघून गेले. मी आणि अण्णांनी तिला जगवायचा खूप प्रयत्न केला. सकाळ-संध्याकाळ पाणी पाजायचो, कळणाकोंडा खाऊ घालायचो; परंतु सगळ्यांनीच मागे टाकलेल्या या गाईचा परदेशात जीव लागलाच नाही. एक दिवस तिनं जीव सोडून दिला. तिला जगवून तिचा डाफण्या वंश वाढवावा असं मी आणि अण्णांनी ठरवलं होतं.

बहात्तरच्या दुष्काळानंतरही मी अनेकदा ढोर वळली आहेत. उन्हाळयाच्या आणि दिवाळीच्या सुट्टीत, सणवार आणि रविवारच्या सुट्टीत, शेतात काही कामाची घाई असेल आणि तिथं गुराख्याची गरज असेल तर, अशा अनेक कारणासाठी ढोरं वळावी लागत. सगळ्यात जास्त वाईट वाटे ते यात्रेच्या दिवशी गुरे राखणं गोपाल चावडी, बाराशिव, औंढा नागनाथ आणि भवानीची जत्रा या परिसरातल्या मशहूर जत्रा, सगळे गुराखी त्यांची वाट पहायचे. पैसे साठवायचे. कामावर साल ठरवतानाच या जत्रेसाठी पडी करण्याचं कबूल करून घ्यायचे आणि जत्रेला जायचेच जायचे.

या सगळ्याच देवांवर गुराख्यांची फार निष्ठा होती. गोपाल चावडी म्हणजे गुराख्यांचीच चावडी. इथं महानुभावांचा देव चक्रधर गुराख्यांशी खेळला होता. त्यांच्याशी डाबडुबलीचा खेळ खेळून त्यांच्या पाठीवर बसला होता. त्यांना सुख दिलं होतं. अजूनही हा देव गुराख्यांना सुख देतो म्हणून अनेक गुराख्यांनी किंवा त्यांच्या आयांनी नवस केलेले असत. ते फेडायला गुराखी तिथं हमखास जात.

औंढा नागनाथाचीही अशीच एक कथा सांगितली जाते. पांडव जेव्हा अज्ञातवासात विराटाकडं होते तेव्हा गाई घेऊन चारायला ते इथं येत. कळपातली एक गाय रोज दुपारी एकटीच एका तळ्यात जाऊन उभी राहात असे आणि नेमकी हीच गाय नेहमी घरी आल्यावर दूध कमी देत असे. विराटाच्या लोकांनी पांडव दूध पितात असं म्हटल्यावर पांडवांनी खरंबरं करायचं ठरवलं आणि भीमानं तळं फोडलं तर गाय उभं राहायची तिथं महादेवाची पिंड निघाली. गाय रोज जाऊन त्यावर दुधाचा अभिषेक करायची. म्हणून दूध कमी द्यायची. विराट राजानं हे सगळं स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्यावर भक्तिभावानं त्या पिंडीची स्थापना केली आणि मंदिर बांधलं. तेच औंढा नागनाथाचं मंदिर. अशी कथा सगळे गुराखी एकमेकांना सांगत मोठ्या भक्तिभावानं महाशिवरात्रीला औंढ्याला जात.

बाराशिवचा मारुती आणि सुकीची भवानी तर आखरावर

गुराख्यांनीच स्थापन केलेले देव. नंतर लोकांनी जत्रा भरवायला सुरुवात केलेली. ज्यांची वर्षभर वाट पाहिली त्या जत्रेला जाऊन गुराखी वेळूच्या काठ्या, बासऱ्या, पावे, सारंग्या, गोंड्याच्या टोप्या आणि चिवडा-बर्फी आणत. नाच-तमाशा-सिनेमा पाहून येत. वर्षभर गुरामागं या सगळ्या गोष्टी नवलाईनं सांगत.

कामावरले गुराखी जत्रेला गेले, की आम्हाला हमखास गुरे राखावी लागत. खूप वाटायचं आपणही जत्रेला जावं; पण जाता येत नसे. कारण बाप म्हणायचा की, वाटेल ते करायला कुणब्याच्या पोटी कशाला यावं? कुणा लाटसाबाच्या पोटी जन्मावं. जल्म घेणं आपल्या हातात नसल्यानं पुढचं सगळंच पराधीन असायचं. गुपचीप गुरं राखायला जावं लागायचं. जत्रा-खेत्रांप्रमाणेच सणासुदीला गड्यानं पडी केली की, आम्हालाच गुरं राखावी लागत. ऐन पंचमीच्या सणाच्या दिवशी पडी करून कामावरचा गडी झोके खेळू लागला की, हुरहुर बाटायची. आपणही झोके खेळावं बाटायचं; पण जमत नसे. मग उगाच आपलं आपण गुरं राखतो आहोत म्हणजे काहीतरी खूप मोठं काम करतो आहोत; असं वाटून घ्यायचो. अण्णा सांगत की प्रत्यक्ष देवाचा अवतार असलेल्या श्रीकृष्णानंदेखील गुरं राखली होती; आपण तर माणूस आहोत. देवानं राखलेल्या गाई आपल्याला राखायला मिळतात हे आपलं भाग्यच. अण्णा असंही सांगत की, प्रत्येक गाईच्या पाठीमागे एक कृष्णा उभा असतो; तो आपणाला दिसत नाही. गावातल्या एका श्रीमंत माणसाच्या बैठकीत लावलेल्या फोटोत प्रत्येक कृष्णासोबत एक गाय हमखास होती. अण्णा सांगत की, हा कृष्ण पापी माणसाला दिसत नसला तरी पुण्यवान माणसाला तो नक्की दिसतो. फोटोतलं आणि अण्णानं सांगितलेलं खोटं कसं असेल, ते खरंच असलं पाहिजे, असं वाटायचं. हा विचार मनात आला की, मी गाईला मारायचं टाळीत असे. रानात मी एकटाच गुरामागं असलो की, आसपास श्रीकृष्ण असल्याचा भास होई आणि ते प्रत्यक्ष दर्शन अर्जुनालाही पहावलं नव्हतं

असं अण्णा सांगत. भर दुपारच्या उन्हात डोळे दिपू लागले की, कृष्णाच आपल्याला दर्शन देतो आहे की काय असं वाटायचं आणि हरखून जायचो. अण्णानं शिकवलेली आरती म्हणायचो.

आरती कुंजबिहारिकी

जय बोलो कृष्ण मुरारी की

अण्णा नेहमी चक्रधराची नांदेडची एक लीळा सांगत. एकदा चक्रधर भिक्षा मागत होते. एका ब्राह्मणाच्या दारी उभं राहून त्यांनी भिक्षा मागितली तेव्हा तो ब्राह्मण चक्रधराला म्हणाला की, तू भीक मागण्यापेक्षा काम का करत नाही, चांगला धट्टाकट्टा दिसतोस, तेव्हा चक्रधरांनी त्यालाच काम मागितलं. त्यानं चक्रधराला गुरं राखायला सांगितलं आणि चक्रधर ते काम इमानेइतबारे करू लागले. पण त्यांची गाई राखण्याची तऱ्हाच अजब होती. चक्रधर गाई राखू लागल्यापासून त्या खूप सुधारल्या होत्या आणि दूधही भरपूर देत होत्या. आणि लोक तर सांगत, हा तुमचा गुराखी गाई चारतच नाही. नुसता खडकावर नेऊन बसवतो. एक दिवस ब्राह्मण प्रत्यक्ष पहायला गेला तर गोदावरीच्या पात्रात एका खडकावर चक्रधर ध्यानस्थ बसलेले आणि त्यांच्यासमोर बसून गाई रवंथ करीत असलेल्या. ब्राह्मणाला आश्चर्य वाटलं. त्यानं तोंडात बोट घातलं आणि स्वतःचे कान धरले. त्याला वाटलं, हा तर प्रत्यक्ष श्रीकृणाचा अवतार आणि आपण त्याला वाईटसाईट बोललो, शिळंपाकं खाऊ घातलं, गुरं राखायला सांगितलं. आज मात्र हा घरी आला की, आपण त्याची क्षमा मागू आणि त्याची यथासांग पूजा करू. त्यानं घरी येऊन बायकोला सगळा वृत्तान्त सांगितला. दोघांनी पश्चात्ताप केला आणि चक्रधरांच्या स्वागताची तयारी करून ठेवली; परंतु चक्रधर त्या दिवशी घरी आलेच नाहीत. त्यांना अंतर्ज्ञानानं सगळं समजलं होतं. नाहीतरी त्यांनी अटच घातली होती की, खुट्याचं वासरू प्यायला सोडील; पण आखडणार नाही. गाय चारायला नेईल; परंतु परत आणून खुट्याला बांधणार नाही.

संध्याकाळी काढताना वासरू सोडणं आणि आखडणं ही कामं गुराख्यालाच म्हणजे मलाच करावी लागत. थानाचं वासरू ओढून खुट्यापर्यंत नेताना इतके हिसडे मारायचं की, त्याला काठीनं बडवावं वाटायचं; परंतु अण्णा तर भराभर गाईचं दूध काढत. ते वासरासाठीच असतं हे माहीत असूनही. चक्रधरांची ग़ोष्ट सांगणारे अण्णा असं कसं वागू शकतात तेच कळत नाही. इतकंच नाही तर एखादी गाय वासरू सोडलं की पान्हा सोडी आणि वासरू आखडलं की पान्हा आखडून घेई. अशावेळी एक तर वासराला पूर्ण दूध पेऊ द्यावं लागे, नाहीतर गाईचे पाय बांधून अण्णा तिला मारत. उपाशीपोटी आणि वासरू पाजायला दावं तोडणाऱ्या गाईला कधी मारू नये, असं अण्णा म्हणत आणि मग असं का वागत? याचं मला नवल वाटे.

गाईचा संध्याकाळचा चारा म्हणजे दिवसभराची बैलाची उरलेली चिपाडं. दादा तेच टाकायला सांगी आणि अण्णा म्हणत निदान दुभत्या गाईला तरी बैलांबरोबरीनं हिरवा चारा टाकावा. त्यासाठी दोघांची भांडणं होत. एका गाईला हिरवा चारा टाकल्यावर दुसऱ्या दावं तोडतात म्हणून अण्णा या गाईला बैलांच्या दावणीला बांधत. त्यावरूनही दोघांची भांडणं होत. घरी अण्णाला आणि दादाला खायला हिवाळ्यात खारीक आणि खोबरं आणलं जात असे. त्यातली एखादी खारीक वडील लहान्या बहिणीला देऊ लागले की आई म्हणे, ती काय आऊत हाणणार आहे काय? अण्णानं गाईला हिरवा चारा टाकला की, दादा म्हणे की, गाईला काय औताला लावायचं आहे?

एखाद्या गुराख्याची गाय व्यालेली असेल तर तिही अशीच त्रास द्यायची. सकाळी गोठ्यातून निघतानाच तिचा पाय तिच्या तान्ह्या वासराजवळून निघत नसे. मारून- ठोकून तिला गुराबरोबर बाहेर काढलं तरी सारखी हंबरत राहायची आणि तिला प्रतिसाद म्हणून वासरूही हंबरत रहायचं. एकमेकांचं हंबरणं ऐकू येईपर्यंत ते हंबरत राहात. त्यामुळेच कदाचित

दिवसभर गाय अस्वस्थ असे आणि सारखी पळून जाण्याचा प्रयत्न करीत असे आणि मग तिला कुणीही रोखू शकत नसे. कुणाच्या तरी हवाली गायी करून तिच्या मागं धावावं लागायचं. ती थेट आपल्या वासराजवळच येऊन उभी राहात असे. एकदा वासराला पाजलं म्हणजे मग ती मोकळी व्हायची. तुम्ही जिकडं न्याल तिकडं यायला तयार असायची. आठदहा दिवस असे गेले की, वासरू चारापाण्याला लागायचं. त्याचं हांबरणं बंद व्हायचं आणि गाईचं पळून येणंही बंद व्हायचं.

गाईचं वासरावरचं हे प्रेम पाहून तिला मारावंही वाटत नसे आणि तिच्यामुळं उन्हातान्हाची धावपळ झाली म्हणून रागही येत असे. "गाय माय, बैल बाप" हे म्हणणंही खरं वाटत असे. गाईच्या अंगात देव असतात. एक दोन नाही तर तेहतीस कोटी देव असतात, असं सखारामजीच्या बैठकीतल्या एका फोटोत पाहून खरं वाटायचं. यामुळे गाईजवळ भूत येत नाही हे म्हणणंही खरं वाटायचं. गुरामागं एकटं असताना गाईचा खूप आधार वाटायचा.

बहुतेक गुराखी आपल्या भाकरी सकाळी घरून निघतानाच धुडक्यात बांधून घेत. उरलेल्या सगळ्यांच्या भाकरी कुणीतरी एक जण जाऊन आणत असे. सकाळी बांधून आणलेल्या भाकरीवर सांडू नये म्हणून घट्ट पिठलं नाहीतर कद्दू-भोपळ्याची कोरडी, पाणी निचरलेली भाजी आणावं लागायची. तरीही त्यात राहिलेलं थोडंफार पाणी भाकरीत मुरून भाकर आस्सी खमंग लागे की, कितीही खात राहावी. सकाळी सोबत आणलेली भाकर काठीला बांधल्यामुळं आणि सारखी खांद्यावर राहिल्यानं भाजी भाकरीचा सारखा वास येत राहायचा आणि तोंडाला पाणी सुटायचं. पण सांच्या पहारी लवकर भूक लागेल म्हणून मोठ्या मुश्किलीनं तोंड आवरावं लागायचं. मन मारावं लागायचं.

दुपारी आखरावर गुरं बसवून कुणीतरी एक जण भाकरी आणायला गेला की, तो येईपर्यंत वाट पाहात बसण्याऐवजी खेळाचा डाव मांडला जात असे.

भाकरी आणताना बऱ्याचदा आणणारा रस्त्यात भाकरी सोडून पाहात असे. काही चांगलं-चुंगलं असेल तर खात असे. बऱ्याचदा ते ओळखायला येत नसे. एकदा एका मुलाला ही चोरी नीट करता आली नाही. त्यानं दुसऱ्या एका जणाचे धपाटे कुरतडून खाल्ले आणि तुझ्या मालकिणीनं असेच मांजरानं खाल्लेलं धपाटे दिले असं सांगितलं. त्या गुराख्यानं घरी गेल्यावर विचारलं की, आज मला मांजराचे उष्टे धपाटे का दिले ? तर मालकिणीनं दोघांना आमनेसामने आणून खरंबरं केल्यामुळं तो भाकरी आणणारा पुढं बदनाम झाला. त्याला सगळे गुराखी उष्टा म्हणून चिडवू लागले. त्याला भाकरीसाठी पाठवणही बंदच केलं.

एकदा मी भाकरी आणायला गेलो होतो. सगळ्यांच्या जमा केलेल्या भाकरी रुमालात बांधून मी आखराच्या रस्त्याला लागलो तर अर्ध्या वाटेत मला वारकाच्या सुनेनं अडविलं आणि मला भाकर मागू लागली. गयावया करून विनवू लागली, सासूनं कालपासून उपासी ठेवलं म्हणून सांगू लागली. मग दुसऱ्या कुणाची भाकर द्यावी तर आपलीही बदनामी होईल म्हणून मी माझीच भाकर तिला देऊन टाकली. तरी पुन्हापुन्हा कळवळ्यानं बिनवू लागली की कुणाला सांगू नका. सासूला समजलं तर ती मला मारील. नवऱ्याला मारायला लावील. तिनं मला माझ्या गळ्याची शपथही घ्यायला लावली.

आखरावर पोचल्यावर मी भाकर खाऊन आल्याचं सगळ्यांना सांगितलं आणि उगाच वढ्यात जाऊन रुमाल धूत बसलो. एक दोन गुराख्याला शंका आली की, माझ्या घरी काहीतरी चांगलंचुंगलं खायला केलं असंल पाहिजे; म्हणून मी घरी जेऊन आलोय. नंतर मला दिवसभर भुकेनं लई कासाविसी होऊ लागली. म्हणून भीम्याच्या शेळीचं दूध द्रोणात पिळून मी पिलं. भीम्याला मी सांगितलं की, माझ्या घरी कुणी नव्हतं आणि माय शेजारी भाकरी ठेवायचं विसरून गेली. त्याला माझा विश्वास वाटला आणि त्यानं मला शेळीचं दूध काढून दिलं.

कधी कधी बाबा स्वतःच भाकर घेऊन येत. त्यांना सकाळीच सांगून ठेवावं लागायचं की आम्ही दुपारी अमुकअमुक आखरावर थांबणार आहोत. मग बाबा तिथं येत. एकदा आम्ही मोठ्या वावरात ढोर नेली कॅनॉलच्या पलीकडं आणि तिकडच्याच आंब्याखाली बसवली. कॅनॉलला सकाळी पाणी नव्हतं. ते दुपारपर्यंत आलं. मी अजून पोहणं शिकलो नव्हतो आणि बाबाला तर पोहताच येत नव्हतं. जवळपास पूल नव्हता. पुलावरून यावं म्हटलं तर धानोरा नाहीतर पळशी गावाजवळ जावं लागलं असतं. एक युक्ती शोधली. धुडक्यात भाकरीचा चेंडूसारखा गच्च गोळा केला आणि चेंडू फेकायला मागं मागं सरतात तसं सरकत जोरात भाकर फेकली; परंतु ती शेवटी पाण्यातच पडली आणि वाहून गेली.

बाबाला खूप हळहळ वाटली. मी त्यांना सांगितलं की सांच्यापहारी बिगीनं यतो घराला; तुम्ही जा परत. सोबती भाकर सोडून खाऊ लागला आणि माझी भूक पुन्हा खवळून उठली आणि अनावर होऊन मी त्या सोबत्याची बाटलेली भाकर खाल्ली. त्याला कुणाला सांगू नका म्हणून सांगितलं. त्याचं बाटलेलं खाल्ल्यावर काहीही होत नाही, असं लक्षात आल्यावर पुढे नेहमी आम्ही चटणी-भाजीची देवाण-घेवाण करू लागलो. परंतु सगळं चोरून, गुपचूप.

उन्हें उतरू लागली म्हणजे आम्ही सारखी सावली मोजत असू; घड्याळ नावाचा प्रकार माहीतच नव्हता. स्वतःची सावली हेच घड्याळ. पूर्वेच्या बाजूनं सावली चौदा-पंधरा पावलं झुकली की आम्हाला आखाड्याची ओढ लागे. पोट भरल्यामुळं आमच्याआधी ती गुरांनाच लागायची. गाई नीट चरेनाशा झाल्या, सतावू लागल्या की, समजायचं यांचं पोट भरलं. गाई आपोआपच रस्त्याला लागत आपण नुस्त त्यांच्या मागं मागं चालायचं.

**('गाई घरा आल्या' आवृत्ती पाचवी)**

❖❖❖

# ८.

## मराठवाड्याचे गांधी : गंगाप्रसाद अग्रवाल

-उत्तम सूर्यवंशी

***उत्तम दीपाजी सूर्यवंशी (जन्म १९४०)*** *राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून सेवानिवृत्त. सामाजिक चळवळीत सहभाग. प्राध्यापक संघटनेत दीर्घ काळ कार्य. नांदेड येथील विद्यापीठाच्या 'हैदराबाद मुक्तिसंग्राम प्रकल्प' समितीचे ते सदस्य होते. मराठवाडा जनता विकास परिषद, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व अखिल भारतीय सत्यशोधक समाज या संस्थांतून सहभाग व महत्त्वपूर्ण कार्य. 'हैदराबाद मुक्तिसंग्राम,' 'स्वातंत्र्यसैनिक,' 'मराठी मातीचे वैभव,' 'गोदाकाठचा राजयोगी,' 'थोरवी,' 'मराठवाड्याचा गॅलिलिओ,' 'युगलक्षण,' 'काळ्या दगडावरची रेघ,' 'वाचननामा' आणि 'प्रकाशयात्री' इत्यादी ग्रंथ प्रकाशित आहेत. 'प्रसाद बन' पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी सन्मानित.*

*प्रस्तुत व्यक्तिचित्रात्मक उताऱ्यातून हैदराबाद मुक्तिसंग्राम आंदोलन आणि स्वातंत्र्योत्तर काळातील महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील भारत मूर्त स्वरूपात आणण्यासाठी गंगाप्रसाद अग्रवाल यांनी दिलेल्या लढ्यावर दृष्टिक्षेप टाकला आहे.*

डॉ. गंगाप्रसादजी अग्रवाल हे नाव महाराष्ट्रात सर्वदूर अत्यंत आपुलकीने व आदराने घेतले जाते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची पहिली मानद 'डी.लिट.' त्यांना मिळाली. त्यांना 'मराठवाड्याचे गांधी' म्हणून सर्व जण ओळखतात. समतेच्या विचारांचे वादळ त्यांना कधीही स्वस्थ बसू दिले नाही. उपेक्षितांच्या दुःखावर फुंकर घालण्यासाठी तसेच त्यांच्यात आत्मविश्वास जागविण्यासाठी, खेड्यापाड्यांत सतत फिरत होते. त्यांनी रुळलेली व मळलेली वाट कधी धरली नाही. स्वातंत्र्याच्या लढाईत ज्या ऊर्मीने व जिद्दीने स्वतःला झोकून दिले, त्याच प्रेरणेने ते समतेच्या रणांगणात उतरले होते.

७ जानेवारी १९२३ चा जन्म. वडील वैश्य वृत्तीचे होते पण गंगाप्रसादजी व्यापारात कधीच रमले नाहीत. त्यांना सर्व जण प्रेमाने 'भाईजी' म्हणून संबोधतात. महात्मा गांधी, बाबासाहेब परांजपे, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या विचारांचे बाळकडू लहानपणीच त्यांच्या अंगात भिनले होते. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, सत्य, अहिंसा, सत्याग्रह या मंत्राने ते भारले गेले. समाजातील विषमतेचे विष उतरविण्यासाठी या मंत्राचा उद्घोष केल्यावाचून गत्यंतर नाही हे त्यांना मनोमन पटले. भाईजी या मंत्राने पेटून उठले. त्यांच्याच शब्दांत सांगायचे झाले तर,

हम इस मिट्टी की खाक है।
जिसे सिंचा संतोंने अमृतधार से
है तो हम नाचीज
लडना चाहते है - मौत की ललकारसे.

हैदराबादच्या मुक्तिसंग्रामात अनेक वेळा मृत्यूने घेरावबंदी केली पण मृत्यूचे आव्हान स्वीकारून त्यांनी त्यावर मात केली. वसमतचे हनुमंतराव मोहरीर, दत्तोपंत आगलावे, विश्वनाथराव कातनेश्वरकर, दारेवार बंधू, नारायण मास्तर जावळे, नागोबा अलसटवार या काँग्रेसच्या चळवळ्यांनी भाईजींच्या आदेशाप्रमाणे ग्रामीण भाग ढवळून काढला. व्यायामशाळा,

वाचनालये, अस्पृश्यता निवारण मेळावे, अशा रचनात्मक कार्यात सर्वच कार्यकर्त्यांनी जीव ओतला. ७ ऑगस्ट १९४७ हा दिवस 'संघराज्य दिन' म्हणून पाळला. निजामाच्या हस्तकांनी म्हणजे प्रामुख्याने 'रझाकार व मजलिस ए-इत्तेहादुल मुसलमीन संघटना' यांनी नुसता उच्छाद मांडला होता. शेतकऱ्यांकडून धान्य स्वरूपात सक्तीची लेव्ही वसूल करण्यात येत होती. भाईंनी शेतकरी व विणकर यांना बरोबर घेतले. कुरुंद्याचे बा. भ. जोशी, श्यामराव इनामदार, वापटीचे बापूराव शिंदे, नागोराव शिंदे, बहिर्जी शिंदे, शाहीर प्रभाकर वाईकर यांनी वसमत तालुक्यात निजामाच्या विरोधात रान उठविले. परभणी जिल्ह्याचा कॅम्प वाशीम येथे होता. विनायकराव चारठाणकर कँपचे प्रमुख तर गंगाप्रसादजी उपप्रमुख निजामी हद्दीत जाऊन त्यांनी अनेक पोलीस ठाण्यांवर अॅक्शन्स घेतल्या. पाच मैलांचा परिसर निजामी मगरमिठीतून सोडविला. दि. १८ जुलै १९४८ ला गंगाप्रसाद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली चार कँपसच्या सैनिकांनी आजेगाव येथे गोवळकोंडा रेजिमेंट विरुद्ध सर्व ताकदीनिशी लढा दिला. या लढाईत बहिर्जी शिंदे हुतात्मा झाले. नागोबा दारेवार, नारायण मास्तर या बहाद्दर सैनिकांनी बहिर्जींना नेणाऱ्या गंगाप्रसादजी व इतर सैनिकांना संरक्षण दिले. स्वातंत्र्याच्या वेदीत बहिर्जी शिंदे यांनी आपले आयुष्य ओवाळून टाकले.

हैदराबाद संस्थान स्वतंत्र झाल्यावर भाईजींनी समतेच्या लढाईत स्वतःला झोकून दिले होते. त्यांच्यातील 'सैनिक' त्यांनी बुलंद ठेवला. वसमत तालुका काँग्रेसचे ते अध्यक्ष झाले. १९५३ मध्ये वसमत नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणूनही त्यांचा सन्मान झाला पण ते सत्तेच्या राजकारणात जास्त काळ रमू शकले नाहीत. साथी एस. एम. जोशी, डॉ. राम मनोहर लोहिया, डॉ. बापूसाहेब काळदाते यांच्या सान्निध्यात आल्यावर राष्ट्रसेवा दलाच्या व्यासपीठावरून ग्रामीण भागात कुळकायदा, लेव्हीची समस्या, अन्नधान्याची टंचाई आणि आधुनिक उत्पादन पद्धतीची आवश्यकता

यावर जनजागरण केले. वसमतच्या विणकरांचा प्रश्न ऐरणीवर आणला. भाईनी आयोजित केलेली श्रमशिबिरे खूपच यशस्वी झाली. भाईनी या काळात लिहिलेले 'गीत रामायण' आजही वर्तमानातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाला तंतोतत लागू पडते.

'राम झाला कामगार, लक्ष्मण शेतकरी
सीता घेई क्रांतीचा अवतार
रावण झाला भांडवलदार - कुंभकर्ण जमीनदार
मध्यमवर्ग बिभिशन होणार'.

राष्ट्रसेवा दलाच्या माध्यमातून भाईजींनी ग्रामविकासाची कामे हाती घेतली. रस्तेबांधणी, बांधबंदिस्ती, पाझर तलाव, विहीर खोदणे अशा प्रकारची कामे सेवा दलाने केली. यानिमित्ताने मराठवाड्याला वसंत बापट, लीलाधर हेगडे, दादा कोंडके, निळू फुले, राम नगरकर यांच्या कलागुणांचा आस्वाद घेता आला. लोकशाहीर प्रभाकरराव वाईकरांनी राष्ट्रसेवा दलाच्या कलापथकाला आपल्या पहाडी आवाजाने साथ दिली. भाईजीनी वसमत-हिंगोली-कळमनुरी या तीन तालुक्यांतील शाळा-कॉलेजच्या मुलांना घेऊन २८ दिवसांची दीर्घ 'भूदान पदयात्रा' काढली. लोकांनी १७ एकर जमिनीचे दान त्यांना दिले. त्यांनी ग्रामदान मिळविले. जयप्रकाश नारायण यांच्या 'नवनिर्माण आंदोलना'निमित्त त्यांनी सबंध देशभर दौरा केला. गुजरात, बिहार व मराठवाड्यात विद्यार्थ्यांनी विकास आंदोलन छेडले. या विकास आंदोलनांना भाईजींचा पाठिंबा होताच पण त्याबरोबर या आंदोलनाला एक वैचारिक आधार दिला. मोहन धारिया, डॉ. बापूसाहेब काळदाते, अनंत भालेराव यांनी भाईजींना त्यांच्या प्रबोधनयात्रेत जिवाभावाची साथ केली.

भाईजींचे 'संपूर्ण क्रांती : एक रूपरेषा' हे पुस्तक तरुणवर्गात चांगलेच गाजले. हे पुस्तक म्हणजे जयप्रकाशजींच्या 'मै धुनी युवको की तलाश में हूँ' या आवाहनाला एका तऱ्हेने प्रतिसाद होता. मराठवाड्याच्या

विकासाच्या संदर्भात गोविंदभाई श्रॉफ आणि शंकररावजी चव्हाण यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. गोविंदभाईंच्या निधनानंतर भाईंनी वसमत येथे 'गोविंदभाई श्रॉफ सभागृह आणि कार्यकर्ता प्रशिक्षण प्रबोधिनी'ची स्थापना केली. त्यांच्या शेजारीच पू. बाबासाहेब परांजपे ग्रंथालय आणि वाचनालय चालविले जाते. भाईजी बहुराष्ट्रीय कंपन्यांचा धोका ओळखून चंगळवादी जीवनामुळे नैतिक मूल्यांचा कसा ऱ्हास होत आहे? स्वदेशी मीठही खाण्याला बंदी कशी आली? याचे विश्लेषण जनसामान्यांपुढे सातत्याने करीत आहेत. भाईंची ग्रामस्थांना निर्धुर चूल बनवून देणे, जात्याला बॉलबेअरिंग बसविणे, सोपे संडास, गोबर गॅस, सौर ऊर्जेचा उपयोग समजावून सांगत. शेतकऱ्यांसमोर झटपट खत, गायीच्या शिंगांतील खत, अमृतजल खत, गांडूळ खत, पंचगव्या खत, हिरवळीचे खत प्रात्यक्षिकांसह बनवून दाखवितात. भाईजींनी स्थानिक स्वरूपात आदिवासी लोकांच्या जंगल जमीन हस्तांतरणाबाबतचे आंदोलन आणि भरवस्तीतील दारू दुकान हटाव आंदोलन चालविले. ग्रामसभेला संपूर्ण अधिकार हा स्वराज्याचा मूळ गाभा आहे. यासाठी त्यांनी आंदोलनाद्वारे शासनाकडे आग्रह धरला. गांधींच्या स्वप्नातील भारत मूर्त स्वरूपात आणण्यासाठी ते शेवटपर्यंत संघर्षशील होते.

महात्मा गांधींच्या 'हिंद स्वराज्य' या ग्रंथाला २००९ साली १०० वर्षे झाली. या ग्रंथातील आशय हीच आमची ऊर्जा आहे. ग्लोबल इकोव्हिलेजचा कार्यक्रम, पर्यावरण असंतुलनाला विरोध, शहरीकरणामुळे मूठभर लोकांच्या हातांत संपत्तीचे केंद्रीकरण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सेझ, मॉल, इ-चौपाला, कान्ट्रॅक शेती, बी.टी. कॉटन इत्यादीं विषयी त्यांची मते रोखठोक होती. भाईजीचा जैतापूर प्रकल्पाला विरोध होता. पर्यायी ऊर्जास्त्रोत असताना अणुवीज प्रकल्प कशासाठी? असा ते सवाल करतात. संकरीत बियाणे आणि रासायनिक खतांमुळे शेतीचे संकरित कंपनीकरण झाले आहे. हे सर्वांत भयावह आहे. एकीकडे भारतातील किमान दहा लाख डॉलर्स (सुमारे ४.१ कोटी) इतकी संपत्ती असलेल्यांची संख्या

गतवर्षी २०.५ टक्क्यांनी वाढून एक लाख पंधरा हजार इतकी झाली आहे. आज आपल्याकडे करोडपतींची संख्या ९५ लाख इतकी झाली आहे आणि दुसरीकडे पन्नास टक्क्यांपेक्षाही जास्त जनतेला जेमतेम एक वेळेसचे जेवण कसेबसे मिळते. जागतिकीकरणात श्रीमंत व गरीब यांच्यातील प्रचंड अंतर वाढतच आहे. अशा वेळी आपले २०२० सालच्या समर्थ व संपन्न भारताचे स्वप्न परिपूर्ण कसे होणार?

गंगाप्रसादजी आपल्या ओघवत्या वाणीने समोरच्या श्रोतृवृंदाला विश्वासात घेऊन समजावून सांगत असत. गंगाप्रसादजी २००२ मध्ये वर्धा येथील महात्मा गांधींच्या सेवाग्राम आश्रमाचे अध्यक्ष झाले. मला वाटते, त्यांच्या आयुष्यातील हा सर्वोच्च सन्मान आहे. प्रा. गंगाप्रसादजी समतेच्या रणांगणावरील योद्धा होते. कार्यसंस्कृतीचा ध्वज त्यांनी सातत्याने उंचावत ठेवला. सर्वोदय हे त्यांचे स्वप्न होते. त्यासाठीच तर ते तन-मन-धनाने कार्यरत असत.

नियोजन मंडळाचे माजी उपाध्यक्ष प्रा. मधू दंडवते वसमतला आले तेव्हा ते भाईजींचे कार्य पाहून प्रभावित झाले. ते म्हणाले, "गांधीजींनी केवळ स्वतःची उंची वाढविली नाही तर सामान्यांचीही उंची वाढविली म्हणून ते 'महात्मा' झाले. असेच चरित्र आणि चारित्र्य गंगाप्रसादजींचे आहे. त्यांनी केवळ एकट्याने काम केले नाही तर अनेक माणसे तयार केली. गंगाप्रसादजींच्या एका डोळ्यात क्रांतीचा अंगार आणि दुसऱ्या डोळ्यात करुणेचे अश्रू आहेत. म्हणूनच त्यांचा मी 'मराठवाड्याचे गांधी' म्हणून गौरव करतो." प्रा. मधू दंडवते यांनी अशा शब्दांत भाईजींचा केलेला गौरव सार्थ वाटतो.

(थोरवी)

Dayanand College Of Arts, Latur
ACC. No.............
Date...............
LIBRARY


Presented Books

# विद्यापीठ गीत

विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा
मानवतेचा मंगलमय हा इथे खेळतो विश्ववारा ।।धृ.।।

तेजोमय उजळितो प्रकाश
श्रमाचे, कष्टाचे आकाश
संपविते सौदामिनी, युगांचा अंधार सारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।।१।।

चंदनाची व्रतस्थ भूमी
प्रज्ञा, प्रतिभा गगनगामी
समतेचा ममतेचा हा साधनेचा अढळ तारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।।२।।

बुद्धकरुणेचा विहार इथे
शिवरायाचा आचार इथे
निरंतर न्यायासाठी स्वातंत्र्याचा इथे पहारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।।३।।

विचार विवेक विज्ञानाचे
ज्ञानतीर्थ हे महात्मतेचे
मातीच्या मोहराचा गोदावरीचा इथे किनारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।।४।।

-फ. मुं. शिंदे

अरुणा प्रकाशन, लातूर
१०३, ओंकार कॉम्प्लेक्स - अ, एवर्डेकर स्टॉप, औसा रोड,
लातूर - ४१३५१२ मो. ९४२१४८६९३५

ISBN 978-93-90019-04-5